
Fox
Publication's
महाराष्ट्र डायरी २०१९
ARTICLE 370
JAMMU & KASHMIR
BUDGET
2019
Demands & Expectations
महाराष्ट्र
TikTok
Getting
ever closer
PLAYERUNKNOWN'S
BATTLEGROUNDS

मराठी वार्षिक ई-मासिक Marathi e-magazin

**संपादक : श्री.केदारनाथ विश्वास गायकवाड.**
**सहसंपादक : प्रतिक दादासो चव्हाण .**
ई-मेल आईडी : rightwriter23@gmail.com

**प्रकाशक : फॉक्स पब्लिकेशन्स**
**शिरवळ ता.खंडाळा जि.सातारा ४१२८०१**

©FOX PUBLICATION2019

३० डिसेंबर २०१९
वर्ष पहिले
विनामुल्य

**इतर मासिकात व्यापार,व्यवसायाची प्रभावी डिजिटल जाहिरात करण्यासाठी ई-मेल किंवा ८६००३३९३९४ वर संपर्क करा**

*टीप - महाराष्ट्र डायरी २०१९ या वार्षिक ई-मासिकात दिलेले लेखाशी संपादक सहमत असतीलच असे नाही,लेख लेखकाचे वैयक्तिक मत आहे.त्याचप्रमाणे या मासिकातील कोणताही मजकूर कायदेशीर पुरावा म्हणून सादर करता येणार नाही.*

फेसबुक पेज लिंक Fox Publication

# संपादकीय........

नववर्षाचे औचित्य साधून फॉक्स पब्लिकेशन पहिला वार्षिक ई-मासिक आपणासमोर सादर करत आहे.

## महाराष्ट्राला

गौरवशाली,अभूतपूर्व,दैदिप्यमान,सामाजिक,राजकीय,भक्तिपूर्ण,पराक्रमी इतिहास आहे. इतिहास म्हणजे एका काळातील दखल घेता येणाऱ्या घटनांची दुसऱ्या काळाने केलेली नोंद होय.२०१९ सालच्या समाप्तीला पूर्ण वर्षात घडलेल्या महत्वाच्या घटनांचा आढावा घेण्याचा प्रयत्न महाराष्ट्र डायरी २०१९ या मराठी ई-मासिकात घेतला आहे

एका महान लेखकाने लिहून ठेवले आहे की,
जीवनात मागे बघून शिकायचे असते आणि पुढे बघून चालायचे असते. २०१९ साल मागे जात असताना या वर्षाने आपल्या हातात काय दिले आणि आपल्या हातातून काय नेले याची आठवण तुम्हाला हे ई-मासिक वाचताना होईल .

ई-मासिकातील बरेचसे लेख हे नवोदित लेखकांचे आहेत.मी संपादक म्हणून नवोदितच आहे.त्यामुळे काही छोट्या मोठ्या चुका असतील तर वाचक सांभाळून घेतील अशी आशा आहे.

ई-मासिक सुरू करण्याचे कारण काय होती ?

१) मराठी भाषेची सेवा आणि मोबाईलमध्ये अडकलेल्या पिढीला वाचन आवड निर्माण व्हावी.
२) नवोदित लेखकांना संधी मिळावी म्हणून या ई-मासिकाची निर्मिती करण्यात आली आहे.
३) सामाजिक बांधीलकी म्हणून या ई-मासिकाची निर्मिती करण्यात आली आहे.

ई-मासिकात देशातील आणि राज्यातील विविध क्षेत्रातील घटनाविषयी मुद्देसूद लिखाण वाचकांच्या समोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्र डायरी २०१९ हे ई-मासिक दर वर्षी आता आपल्या भेटीला येणार आहे.त्याचप्रमाणे दर महिन्याला एक ई-मासिक वाचकांच्या भेटीला येत आहे.त्यासाठी नवोदित आणि अनुभवी लेखकाना लेख ,कविता ,कथा द्यायच्या असल्यास फॉक्स पब्लिकेशनच्या मेल आयडी किंवा संपर्क क्रमांकवर चौकशी करा.

**केदारनाथ विश्वास गायकवाड**
**संपादक,**
**महाराष्ट्र डायरी २०१९ ई-मासिक**
**डिसेंबर २०१९**
rightwriter23@gmail.com

# अनुक्रमणिका


## शेतकरी अन्नदाता

- उन्हाळा आणि दुष्काळ..............श्री.रविराज युवराज देवगुडे......०८
- पाऊसाचा कहर बुडले सांगली कोल्हापूर.........श्री.सुनील मगर....११

## ग्लोबल वार्मिंग ....................रेश्मा गणेश ढवळे.....१५

## भारतातील आणि महाराष्ट्रातील ..................१९ राजकारणातील बदल ..............श्री.प्रतिक दादासो चव्हाण.

- लोकसभेची निवडणूक
- भारतातील इतर राज्यातील निवडणुका

## भारतातील आणि महाराष्ट्रातील महत्वाचे बदल ..........................ॲड.श्रीकांत रावसाहेब भोसले....

- २०१९ – २०२० या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प............अक्षय रांगोळे ...............................२३
- तिहेरी तलाक नवीन कायदा अस्तित्वात............२७
- काश्मीरचा प्रलंबित प्रश्न ३७० कलम ३५A नियम रद्द

• वाहन कायद्यातील नव्या तरतुदी

• राष्ट्रीय नागरिकत्व दुरुस्ती विधायक

## पुलवामा भ्याडहल्ला आणि हवाई प्रतिउत्तर

......................टीम फॉक्स पब्लिकेशन...............................३७

## प्रलंबित रामजन्मभूमी खटला निकाल

......................टीम फॉक्स पब्लिकेशन...............................४१

## क्रीडाक्षेत्र ..........................श्री.आकाश विठ्ठल काटवटे.

• महिला क्रिकेट संघाची काम ....................................४३

• विश्वविक्रम भारतीय कर्णधार मिताली राजचा 200वा वन-डे सामना

• हॉकी भारताचा राष्ट्रीय खेळ

• ओडीशाने चौथ्यांदा जिंकली राष्ट्रीय हॉकी स्पर्धा

• साऊथ एशियन गेममध्ये भारताची दमदार कामगिरी

• क्रिकेट वर्ल्ड कप २०१९मधील भारताची कामगिरी

## विज्ञान-तंत्रज्ञान

.....................टीम फॉक्स पब्लिकेशन्स............................५३

• चांद्रयान २ भारताची अवकाशातील महत्वपूर्ण आणि महत्वकांशी मोहीम

• नवीन मोबाईल २०१९

- Tik-tok व्हिडिओ मोबाईल ॲप
- ग्राफिक्स गेम

**संस्था परिचय** ..............................................६५

जयहिंद फाउंडेशन “सैनिक हो तुमच्यासाठी”...............

**काळाच्या पडद्याआड**

.......................टीम फॉक्स पब्लिकेशन्स................................६९

# शेतकरी अन्नदाता

## मे २०१९ : **उन्हाळा आणि दुष्काळ**

अत्यल्प पाऊस आणि त्यामुळे भूजल साठ्यात झालेली घसरण, यामुळे पाण्याची तीव्रता वाढते. मराठवाड्यात एक हजार ऐंशी टँकर पाणी पुरवत केला. या टँकरचा प्रवास हजारो किलोमीटर झाला आहे. मराठवाड्यातील अनेक गावांना सव्वाशे किलोमीटर अंतरावरून पाणी पुरवले गेले. एकीकडे रस्त्यावर उसाने भरलेल्या मालमोटारी दिसतात, तर दुसरीकडे पाण्याचे टँकर. मराठवाड्यातील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. हे टँकरचे पाणी शुद्धही नसते. त्याचा विचारच केला जात नाही. या पाण्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. लहान मुलांना पोटाचे विकार होतात. राज्यात चालू वर्षी १९७२ च्या दुष्काळापेक्षा भयावह परिस्थिती होती. पाण्याचे नियोजन करणे ही काळाची गरज आहे. एकवेळेस अन्न मिळेल, पण पाणी मिळेल याची शाश्वती नाही.दुष्काळाने ग्रामीण जनता हैराण झालेली. जानेवारीतच महिलांना पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करावी लागत होती.

पिण्याच्या पाण्याबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही होते. मराठवाड्यात जवळपास ६७ लाख जनावरे आहेत . बीड जिल्ह्यातील चारा संपल्याचे जिल्हा प्रशासनाने मे महिन्यात जाहीर केले. या ६७ लाख जनावरांना ४०

मेट्रिक टन चारा हवा.१४ टन चाऱ्याची कमतरता भासत होती असे प्रशासनाने सांगितले. शेततळी, विहिरी, बोअर असूनही फळबागा सुकल्या. शेतकरी हैराण झाला . जनावरांना चारा नसल्याने अडचण झाली. जनावरे वाचली तरी खूप, अशी प्रतिक्रिया शेतकरी देत होते. बाजारात जनावरे विकत घेतली जात नव्हती.जनावरांच्या किमती खूप कमी झाल्या होत्या. जलयुक्त शिवार योजना झालेल्या गावांनाही पाणी पुरवावे लागत होते. त्यामुळे दुष्काळाची दाहकता किती होती याचा अंदाज येईल.

राज्याचे भौगोलिकदृष्टय़ा तीन भाग करून दुष्काळ अधिक चांगला समजून घेता येईल. पश्चिमेकडचा कोकण व सह्य़ाद्रीच्या घाटाचा भाग, त्यापुढे मध्य महाराष्ट्र, मराठवाडय़ाचा बुलढाणा-वाशिमपर्यंत पर्जन्यछायेचा प्रदेश आणि नंतर विदर्भ. पर्जन्यछायेच्या प्रदेशाच्या दक्षिणेकडे सांगलीचा जत तालुका, उत्तरेला धुळ्याचा शिरपूर तालुका, पश्चिमेला पुणे तर पूर्वेला बुलढाणा-वाशिम हे भाग आहेत. या भागात ४०० ते ७०० मिमीदरम्यान पाऊस पडतो. त्यामुळे या मधल्या भागाला दुष्काळाचा प्रश्न भेडसावतो. या वर्षीचा दुष्काळ अन्नधान्याचा नाही. नागरिकांना काम मिळण्याचा नाही. हा दुष्काळ पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा आहे. दुष्काळ पडला तरी स्थलांतर करावे लागू नये या दृष्टीने एक वर्ष पुरेल इतक्या अन्नधान्याची, जनावरांच्या चाऱ्याची तजवीज करून ठेवावी ही आपली परंपरा आहे. ती परंपरा आज विसरली आहे. ‘तव्यावरची तुझी अन् काटवटीतली माझी’ अशीच सगळी परिस्थिती आहे. १९७२ सालीही पर्जन्यछायेच्या भागातच दुष्काळ होता, पण तो दुष्काळ पिण्याच्या पाण्याचा नव्हता तर अन्नधान्य आणि हाताला काम यांचा होता.

जिथे पिण्याचे पाण्याचा प्रश्न होते तेथील शेती पिकण्याची , फळबागा टिकण्याची कोणतीही आशा राहत नाही.शेतकर्यांचे नगदी पिके पाण्यावाचून वाळून गेली आहेत .

**श्री.रविराज युवराज देवगुडे.**
**+91 98508 28575**
**(प्रगतशील पदवीधर शेतकरी,  एम.ए, बी.एड )**
**मु.पो.त्रिपुटी ता.कोरेगाव जि.सातारा**



## ऑगस्ट २०१९ : **पाऊसाचा कहर बुडले सांगली कोल्हापूर**

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात पुरामुळे हाहाकार उडाला. कोल्हापुरातील २३९ तर सांगलीतील ९० गावांना पुराचा फटका बसला. सातारा जिल्ह्यातील पाटण,कराड आणि शेजारील तालुक्यांना त्याचा फटका बसला. या पुरात दुध पंढरी म्हणून ओळखणाऱ्या कोल्हापुरातील अनेक जनावरे दगावली. प्रमुख नगदी पिक ऊस पुराच्या पाण्याने खराब झाला. कोल्हापुरात सरासरीच्या १२४ टक्के तर सांगलीत सरासरीच्या २२३ टक्के पाऊस पडला असे हवामान खात्याच्या अधिकार्यांनी सांगितले. येथील शेतीचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. राज्य सरकारने १५४ कोटी रुपये पूरग्रस्तांच्या मदतीसाठी तरतूद केली. एनडीआरएफचे जवान, लष्कर, नौदल आणि प्रशासनामार्फत बचावकार्य करण्यात आले.

### पुराची परीस्थीतीत का निर्माण झाली ?

सातारा, कोल्हापूर आणि सांगली या तीन जिल्ह्यात आठ ऑगस्टपर्यंत सरासरीपेक्षा साठ ते सत्तर टक्के अधिक पावसाची नोंद झाली होती. सह्याद्री पर्वतरांगेत, विशेषतः कृष्णा खोऱ्यातल्या नद्या उगम पावतात त्या महाबळेश्वर परिसरात पावसानं यंदा अनेक रेकॉर्डस मोडले . South Asia Network on Dams, Rivers and People (SANDRP) या संघटनेनं प्रकाशित केलेला अहवाल नदी आणि धरणांसंदर्भातले अभ्यासक हिमांशू ठक्कर आणि परिणीता दांडेकर यांनी तयार केला. अतिवृष्टी आणि धरणांच्या व्यवस्थापनात

नसलेला समन्वय या दोन्ही गोष्टींमुळे कोल्हापूर आणि सांगलीतलं पूरसंकट अधिक गहिरं झाल्याचं हा अहवाल सांगतो. वारणा खोऱ्यात पाटणजवळ पाथरपुंज गाव आहे, तिथं यंदाच्या मोसमात 6,500 मिमी पाऊस झाला. खुद्द महाबळेश्वरमध्येच 5,500 मिमी पाऊस झाला आहे. हा किती वर्षांतला उच्चांक आहे हे पाहावं लागेल, पण मान्सूनचा काळ अर्धाही संपलेला नव्हता त्यावेळी एवढा पाऊस नोंदवला जाणे, हे अभूतपूर्व होते. अनेकदा नद्यांची खोरी दुर्गम भागांत असतात, तिथे जुनी माहिती उपलब्ध नसते. पण कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत जुने रेकॉर्डस, जुन्या पूररेषांच्या नोंदी उपलब्ध आहेत. सामान्यतः पूर येतो, तेव्हा मुख्य नदीला आणि तिच्या काही उपनद्यांना पूर आलेला असतो. पण आत्ता कृष्णेच्या सगळ्याच उपनद्यांनाही खूप मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. त्यामुळं महाराष्ट्रातल्या आणि कर्नाटकातल्या मलप्रभा, घटप्रभा या उपनद्यांनी पूररेषा ओलांडली.

### धरणातून किती पाणी सोडण्यात आले ?

पावसाचा अंदाज कदाचित धरणाच्या प्रशासनाला आला नसावा, धरणांतून पाणी सोडलं नसतं तर पूर थांबला नसता. पण त्याचा परिणाम कमी नक्कीच करता आला असता, व्यवस्थित नियोजन केलं तर पूरनियंत्रणासाठी ही गोष्ट महत्त्वाची ठरू शकतात. धरणाचा पाणी नियोजनचा एक असा तक्ता ज्यात त्यात त्या धरणाचं पाणी कसं कधी सोडायचं याची माहिती दिली असते. धरणाची क्षमता काय आहे, तिथे किती गाळ साठला आहे, त्या परिसरातला पाऊस कसा आहे अशा निकषांवर ही माहिती आधारीत असते. समस्या अशी आहे की या rule curves ना गोपनीय ठेवलं आहे, त्याची कुठलीही माहिती लोकांसमोर नाही. आपल्याकडे धरणांत किती गाळ साठला आहे याचीही माहिती लोकांना उपलब्ध नाही.

कोयनानगर : ०४ ऑगस्ट रोजी कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे तीन फुटावरून साडेसहा फूट उचलण्यात आले. सकाळी सांडव्यातून 39 हजार 36 क्यूसेक व विजगृहातून दोन हजार 100 cusecs असा एकूण विसर्ग 41 हजार 136 क्यूसेक आहे.

राधानगरी : ०१ ऑगस्ट कोल्हापूर जिल्ह्यात धुव्वाधार पावसामुळे राधानगरी धरणातील पाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढली. सकाळी आठ ते दुपारी चार या आठ तासांतच धरणाची पाणी पातळी तब्बल सव्वाफुटाने वाढली होती. एका दिवसात दुपारी चारपर्यंत राधानगरी धरणात 89 टक्के पाणी संचय झाला. म्हणजे आठ तासांत तीन टक्के साठा वाढला होता. पाणी पातळी झपाट्याने वाढण्याची यंदाची ही पहिलीच वेळ होती. मुसळधार पावसामुळे जलाशयात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात होत झाली . धरणात 7.97 टी.एम.सी. पाणीसाठा झाला. जलाशयातून भोगावती नदीपात्रात वीजगृहातून 1400 क्युसेक पाण्याचा विसर्ग भोगावती नदीपात्रात सुरू करण्यात आला.तालुक्यात सर्वत्र असलेल्या पावसामुळे ओढे, नाले दुथडी भरून वाहत होते.त्यामुळे भोगावती नदीला पूर आला. नदीवरील शिरगाव, तारळे, राशिवडे, हळदी येथील बंधारे पाण्याखाली गेले . 24 तासांत 140 मि.मी. पाऊसाची नोंद झाली. प्रकल्प 81 टक्के म्हणजे 1527 द. ल. घ. फू. पाणीसाठा झाला.24 तासांत आजरा मंडलमध्ये 104 मि.मी., मलिग्रे मंडलमध्ये 95 मि.मी., उत्तूर मंडलमध्ये 76 मि.मी., गवसे मंडलमध्ये 160 मि.मी. अशा सरासरी 108.75 मि.मी. पावसाची नोंद झाली होती.

गगनबावडा तालुक्यात व धरणक्षेत्रात सलग चार दिवस जोरदार पर्जन्यवृष्टी झाली होती.चोवीस तासांत गगनबावडा तालुक्यात 228 मि.मी. पावसाची नोंद

झाली. गगनबावडा येथे 2853 मि.मी. पावसाची नोंद झाली आहे होती. कुंभी धरणक्षेत्रात 225 मिलिमीटर, तर कोदे धरणक्षेत्रात 233 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. कुंभी धरणातून 350 क्युसेक, तर कोदे धरणातून 1231 क्युसेक पाण्याचा विसर्ग अनुक्रमे कुंभी व सरस्वती नदीपात्रांत सुरू आहे.

कोल्हापूर ,सांगली,कराड,पाटण या ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले.पुणे-बंगलोर महामार्ग आठ दिवस बंद राहिला.पावासाचा जोर काही प्रमाणावर कमी झाल्यानतर संपूर्ण महाराष्ट्रातून जीवनावश्यक वस्तूची मदत या पूरग्रस्त भागांना देण्यात आली.देशाबाहेर राहणाऱ्या काही लोकांनी त्यावेळी मदत केली. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी संपूर्ण महाराष्ट्र धावताना आम्ही पाहिला .

**श्री.सुनील जोतीराम मगर .**
**+91 99236 82410**
**बी.कॉम (मॅनेजर सुर्वेज प्युअर नॉनव्हेज, पुणे)**
**पत्ता : मु.पो.ढोरोशी, ता.पाटण,जि.सातारा**
**mail id : magarsunil503@gmail.com**

## ग्लोबल वार्मिंग: जागतिक तापमानवाढ

सध्याची तापमानवाढ ही पूर्णतः मानवनिर्मित असून मुख्यत्वे हरितगृह वायू परिणाम हरितगृह वायू परिणामामुळे होत आहे. हरितगृह वायूंचे वाढलेले प्रमाण त्याला कारणीभूत आहे. या वायूंमध्ये बाष्प, कार्बन डाय-ऑक्साइड, मिथेन, नायट्रस ऑक्साइड, ओझोन आणि क्लोरोफ्ल्युओरोकार्बन सीएफ् सी इत्यादींचा समावेश होतो. इंटरनॅशनल पॅनल ऑन क्लायमेट चेंज (आयपीसीसी) या आंतरराष्ट्रीय मंडळाने असा निष्कर्ष मांडला आहे की, विसाव्या शतकाच्या मध्यापासून तापमानात झालेली वाढ ही मनुष्यनिर्मित आहे. भविष्यात कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण जसे वाढेल, त्यानुसार तापमानवाढीचा वेगही आतापेक्षा अधिक वाढणार आहे आणि ही नक्कीच आपल्यासाठी चांगली बातमी नाही, अशा शब्दांत शास्त्रज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे.

गेल्या शंभर वर्षांत यापूर्वी कधीही झालेली नाही एवढ्या झपाट्यानं तापमानवाढ झाली आहे. विषुववृत्तीय भागातील जी थोडी पर्वत शिखरे हिमाच्छादित आहेत. त्यातील किलिमांजारो हे पर्वत शिखर प्रसिद्ध आहे. या पर्वत शिखरावरील हिमाच्छादन इ.स. १९०६ च्या तुलनेत २५ टक्केच उरले आहे. मेक्सिकोच्या आखातातील खोलवर असलेल्या उबदाफेलिक्स या सागरी तुफानाच्या वेळी त्या भागावरच्या आकाशात कार्बन डायऑक्साईडची पातळी १०० पटींनी वाढल्याचं दिसून आलं होतं. विकासाच्या मार्गावर धावायचे असेल तर औद्योगिकरण हवे. या औद्योगिकरणासाठी इंधनाचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.गाड्यांपासून मोठमोठे

कारखाने इंधनावर चालतात. सिमेंटची जंगले उभारण्यासाठी नैसर्गिक जंगलांची कत्तल केली जाते. विजेसाठीही कोळसा जाळावा लागतो, नाही तर पाणी चक्रात घालून तिची निर्मिती करावी लागते. या सगळ्यातून व्यय होणाऱ्या वायूने आता अवघ्या जगाला कवेत घेतले आहे.

भारतात पर्यावरणीय बदलाचे भयावह परिणाम दिसू लागले आहेत. भारत २०४५ पर्यंत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनणार आहे. तोपर्यंत आपण जागे न झाल्यास पर्यावरणीय बदलांनी भारतावर मोठे परिणाम घडविलेले असतील. गंगा आणि ब्रह्मपुत्रा या नद्यांच्या पात्राच्या आरंभाशी असलेला बर्फाच्छादित प्रदेशातील बर्फ वितळेल. या दोन्ही नद्यातील सुमारे सत्तर टक्के पाणी हे एरवी बर्फ वितळूनच येत असते. ते एकाच वेळी वितळल्याने बर्फाखालचे डोंगर उघडे पडतील आणि या नद्यांचे पाणी एकत्रितरित्या वाहून जाऊन समुद्राची पातळी वाढेल. मॉन्सूनचा बेभरवशीपणा वाढेल. त्याचे परिणाम मॉन्सून आधारीत शेतीवर होतील. नद्यांवरही होतील. सहाजिकच पिण्यासाठी आणि वीज निर्मितीसाठी पाण्याचा तुटवडा भासेल.

## तापमान वाढीची कारणे

1. ज्वालामुखींच्या उत्सर्जन - ज्वालामुखींच्या उत्सर्जनाने देखिल जागतिक तापमान बदलू शकते. त्यांचा परिणाम तापमान कमी होण्यात देखिल होऊ शकतो. कारण वातावरणातील धुलिकणांचे प्रमाण वाढते जे अल्ट्राव्हायोलेट लहरी शोषून घेण्यात कार्यक्षम असतात. ज्वालामुखींच्या उत्सर्जनाने तापमान एखाद दुसरे वर्षच कमी जास्त होउ शकते. त्यामुळे ज्वालामुखीचा तापमानावर परिणाम तात्कालिन असतो.

2. जागतिक तापमानवाढीला जीवाश्म इंधनाचे ज्वलन आणि वृक्षतोड या दोन प्रमुख बाबी कारणीभूत आहेत. जीवाश्म इंधनांचे बहुतांशी ज्वलन वाहनांमध्ये, उदयोगांमध्ये आणि विद्युतनिर्मिती केंद्रांमध्ये होत असते. या ज्वलनातून कार्बन डाय-ऑक्साइड ($CO_2$) या हरितगृह वायूची निर्मिती होते. वनस्पती स्वत:चे अन्न तयार करताना प्रकाशसंश्लेषण क्रियेत हवेतील $CO_2$ चा वापर करतात. वातावरणातील $CO_2$ वायू शोषला जाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे या वायूचे प्रमाण वाढत आहे.
3. औद्योगिक क्रांती - औद्योगिक क्रांती घडल्यानंतर फार प्राचीन काळी गाडल्या गेलेल्या जंगलांचा मानवाने इंधन म्हणून मोठ्या प्रमाणावर वापर सुरू केला. कुठलाही कार्बनी पदार्थ जाळला की त्यातून कार्बनडाय ऑक्साईडची निमिर्ती होते. त्याप्रमाणे लाकूड आणि दगडी कोळसा जाळल्यानंतर वातावरणात कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढू लागले. दगडी कोळसा जाळला जात असताना कार्बन डायऑक्साईड वायूबरोबर काही कोळशामध्ये असलेल्या गंधक आणि त्याची संयुगे यांच्या ज्वलनाने सल्फर डायऑक्साईडही हवेत मिसळू लागला. विसाव्या शतकात कोळसा याच्या बरोबर खनिज तेल आणि इंधन वायूंच्या ज्वलनामुळे निर्माण होणाऱ्या कार्बन डायऑक्साईडची भर पडली. नैसर्गिक तेल आणि वायू आपण इतक्या मोठ्या प्रमाणावर वापरू लागलो की वातावरणात कोळसा जाळून जमा होणाऱ्या कार्बन डायऑक्साईडमध्ये भरपूर भर पडून हरितगृह परिणाम वाढू लागला.
4. सूर्यकिरणांची दाहकता - सूर्यकिरणांची दाहकता वाढल्यास जागतिक तापमान वाढ होण्याची शक्यता असते. परंतु सध्याच्या

परिस्थितीत सूर्य किरणांचे उत्सर्जन हे नेहेमीप्रमाणे आहे. किरणांची दाहकता कमी जास्त झाल्यास जागतिक तापमान तात्कालिन कमी जास्त होते, दीर्घकालीन दाहकता कमी अथवा जास्त झालेली नाही,त्यामुळे सध्याच्या तापमान वाढीस हरितगृह परिणामच जवाबदार आहे.

## तापमान वाढीचे भारतावर होणारे परिणाम

1. पूर येण्याचे प्रमाण आणि त्याच्या तीव्रतेतही वाढ होईल. किनाऱ्यालगत रहाणाऱ्या लोकांना याचा मोठा त्रास होईल.
2. गव्हाच्या उत्पादनात चार ते पाच दशलक्ष टनांनी कपात होईल.
3. बर्फाच्छादित प्रदेश वितळल्याने समुद्राची पातळी वाढेल. परिणामी समुद्रकिनारी दाट वस्ती असलेल्या देशांना मोठा फटका बसेल. त्यामुळे मुख्य भूमीवर पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होईल. समुद्राकाठची मॅनग्रोव्ह जंगले नष्ट होतील.
4. तापमान किमान एक अंश सेल्सियसने वाढेल.
5. एकाच वेळी वितळल्याने बर्फाखालचे डोंगर उघडे पडतील आणि या नद्यांचे पाणी एकत्रितरित्या वाहून जाऊन समुद्राची पातळी वाढेल.

**श्रीमती रेश्मा गणेश ढवळे.**

**शिक्षण – BA**

**मु.पो.आसरे ता.वाई जि.सातारा**

**mail id - reshmadhavale1993@gmail.com**

# भारतातील आणि महाराष्ट्रातील राजकारणातील बदल

## २०१९ भारतदेशातील आणि राज्यातील राजकीय घडामोडी

*भारतातील पाच राज्यात निवडणुका पाहायला मिळाल्या.काही राज्यात सत्ता परिवर्तन तर काही ठिकाणी सत्ताप्रस्थापित झाल्याचे पहायला मिळाले.*

### २०१९ साली भारताची लोकसभा निवडणुक

भारत देशामधील सार्वत्रिक राष्ट्रीय निवडणुका झाल्या. ११ एप्रिल ते १९ मे २०१९ दरम्यान एकूण ७ टप्प्यांत या निवडणुकांमधून सतराव्या लोकसभेमधील सर्व ५४३ खासदारांची निवड केली गेली. मतमोजणी २३ मे रोजी झाली.लोकसभेचा निकाल काहीसा असा पहायला मिळाला.भारतीय जनता पक्ष ३०३ खासदार ,राष्ट्रीय कॉंग्रेस ५१ खासदार, तृणमूल काँग्रेस २२ खासदार शिवसेना १८ खासदार अशी प्रमुख राजकीय पक्षांची आकडेवारी पहायला मिळाली.

भारताच्या पंतप्रधान पदावर पुन्हा एकदा श्री.नरेंद्र मोदी याना विराजमान होण्याचा बहुमान मिळाला.

मै नरेंद्र दामोदरदास मोदी ***भारताच्या पंतप्रधान मोदींचा जीवनपरिचय मराठीतून pdf ई-बुक क्लिक करा आणि वाचा***

राजनीत शहेनशहा : अमित शाह - ***राजकाणातील चाणक्य केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या आयुष्याची माहिती देणारे मराठी pdf ई-बुक क्लिक करा आणि वाचा***

## इतर राज्यातील लोकसभा निवडणुका आणि निकाल

मार्च – एप्रिल महिन्यात **आंध्रप्रदेश** राज्यात विधानसभा निवडणुका झाल्या. या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ११ एप्रिल २०१९ रोजी YCR कॉंग्रेस पक्षाची सत्ता येऊन मुख्यमंत्री श्री.वाय.एस.जगनमोहन रेड्डी हे विराजमान झाले.एप्रिल२०१९ च्या आगोदर तेलगु देसम पक्षाची सत्ता होती आणि मुख्यमंत्री पदाची जबाबदारी एन.चंद्राबाबू नायडू यांच्याकडे होती.

मार्च – एप्रिल महिन्यात **ओडीसा** राज्यात देखील विधानसभा निवडणुका झाल्या. ओडीसा राज्यात बिजु जनता दल पक्षाची सत्ता होती आणि ती कायम राहिली.ओडिशा राज्याचे मुख्यमंत्रीपद नवीन पटनाईक याना मिळाले.

मार्च – एप्रिल महिन्यात **अरुणाचलप्रदेश** मध्ये विधानसभा निवडणुका झाल्या. निवडणुका आगोदर त्याठिकाणी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय जनता दलचे सरकार होते.मात्र २०१९ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला एकहाती सत्ता मिळाली आणि पेमा खंडू पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले आहेत.

मार्च – एप्रिल महिन्यात **सिक्कीममध्ये** विधानसभा निवडणुका झाल्या. सिक्कीममध्ये सत्ता पालट झाली सत्तेत असलेले सिक्कीम डेमोक्रेटिक पक्षाला पायउतार व्हावे आगले आणि सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा चे मुख्यमंत्री झाले.प्रेमसिंग तमंग याना मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला.

सप्टेबर-ऑक्टोबर २०१९ मध्ये **महाराष्ट्र आणि हरियाना** राज्यात विधानसभा निवडणुका झाल्या.

**हरियानात** भारतीय जनता पक्षाचे सरकार होते मात्र २०१९ निवडणुकीत बहुमत न मिळाल्याने भाजपाला जननायक जनता पार्टी सोबत सत्ता स्थापन केली.मोहन लाल खट्टर मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले.

**महाराष्ट्र** विधानसभा निवडणूक नेत्यांच्या पक्षांतराने खूप चर्चेत राहिली.राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या अनेक बड्या नेत्यांनी भारतीय जनता पक्षात आणि शिवसेनेत प्रवेश केला.

माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य - ***१९६० पासूनचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्र्याची सविस्तर माहिती pdf ई-बुक क्लिक करा आणि वाचा.***

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत देले.मात्र मुख्यमंत्री पदाच्या वादात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांनी सता स्थापन केली नाही. १५ दिवसात सरकार स्थापन न झाल्याने राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.

शिवसेनेने राष्ट्रवादी,काँग्रेस पक्षांशी आघाडी करत सत्ता स्थापन केली.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांनी सांभाळले आहे .

**श्री.प्रतिक दादासो चव्हाण .**

**+91 9156999191**

**बी.कॉम (एल.एल.बी. प्रथम वर्ष)**

**पत्ता : मु.पो.भादे , ता.खंडाळा, जि.सातारा.**

सत्ता केंद्र : शरद पवार - ***महाराष्ट्राच्या लाडक्या नेत्याचा राजकीय प्रवास pdf ई-बुक क्लिक करा आणि वाचा.***



# भारतातील आणि महाराष्ट्रातील महत्वाचे बदल

## २०१९ – २०२० या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प

जुलै महिन्यात देशाचा आर्थिक अर्थसंकल्प सादर केला गेला.भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी अर्थसंकल्प लोकसभेत मांडला. देशाच्या विकासासाठी सरकारी तिजोरीतून कसा पैसा खर्च केला जाईल त्याचा ताळेबंद यात सादर केला गेला. अर्थसंकल्पात अर्थमंत्री वेगवेगळ्या घोषणा विकासाच्या घोषणा करतात. २०१९ च्या अर्थसंकल्पात काय तरतुदी केल्या पाहूयात.

### सर्वात प्रथम कोणत्या वस्तू स्वस्त झाल्या त्या पाहूयात

गृहकर्ज, इलेक्ट्रॉनिक कार,मोबाईल चार्जर,साबण,sanitary napkin,शाम्पू,हेअरoil टूथपेस्ट,कपडे धुण्याची पावडर,ट्रव्हलbag,स्वयंपाकाची भांडी,चश्माफ्रेम,चादर,खोबरे,पास्ता,विमा,सेटअप बाक्स,आयात संरक्षण साहित्य आणि बर्याच गोष्टी स्वस्त झाल्या.

### कोणत्या वस्तू महाग झाल्या त्या पाहूयात

पेट्रोल,डीजेल,सोने,चांदी,सिगारेट,तंबाखू,एअर कंडीशन,लाउडस्पीकर,डीजीटल व्हिडीओ रेकार्डर,सीसीटीव्ही कॅमेरा,आयात पुस्तके,वर्तमानपत्रे व मासिकांचा कागद, आयात प्लास्टिक,टाईल्स,स्टेनलेस उत्पादने,पीव्हीसी पाईप,वाहन कर्जे,काजू.

**अर्थसंकल्पात कोणते बदल सवलती देण्यात आल्या त्याची माहिती खाली देत आहोत.**

गृहस्वप्न आवाक्यात, ४५ लाखांपर्यंत गृहकर्जाच्या व्याजात वर्षाकाठी आता मिळणार ३.५ लाखांपर्यंत प्राप्तिकर सवलत.

प्राप्तीकर परतावा भरण्यासाठी पॅन कार्डची आवश्यकता नाही, आधार कार्डचा उपयोग करता येईल.

डिजिटल पेमेंटचा भार बँकांवर ग्राहकांसाठी मोफत व्यवहार.

तंबाखूच्या उत्पादनांवरील उत्पादन शुक्ल वाढवले.

पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रतिलिटर १ रुपयाची वाढ

सोने-चांदीवरील सीमा शुल्कात १० टक्क्यांवरून १२.५ टक्क्यांपर्यंत वाढ

पाच लाखांवरील वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना प्राप्तिकर लागू, कर रचनेत कुठलाही बदल नाही.

नागरिकांना आता पॅन किंवा आधार यापैकी कुठलाही एक नंबर देण्याची सुविधा

१२० कोटींहून अधिक भारतीयांकडे आधार

स्टार्टअप सुरू करणाऱ्यांना भरमसाठ करसूट

इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीवरील जीएसटी १२ टक्क्यांवरू ५ टक्के करणार

सरकारचे निर्गुंतवणुकीचे लक्ष्य १.५ लाख कोटी

१, २, ५, १० आणि २० रुपयांची नवी नाणी लवकरच चलनात येणार

देशात १७ आदर्श पर्यटन स्थळं उभारणार

सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजे सरकारी बँकांना ७० हजार कोटींची मदत देणार

बँकांनी विक्रमी ४ लाख कोटींची कर्जवसुली केली

बँकांच्या अनुत्पादीत मालमत्तेत (NPA) मोठी घट

१८० दिवसांची वाट न पाहता अनिवासी भारतीयांना (NRI) तातडीने आधार कार्ड देणार

दोन कोटी शेतकऱ्यांना डिजिटल शिक्षण देणार

महिला सक्षमीकरणासाठी समिती नेमणार

अर्थव्यवस्थेत महिलांचे योगदान महत्त्वाचे, ग्रामीण क्षेत्रातही महिलांचे बहुमोल योगदान

आतापर्यंत ३० लाख नागरिक पेन्शन योजनेशी जोडले गेले

रेल्वे स्थानकांच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र सरकारची मोठी योजना

३५ कोटी एलईडी बल्ब आतापर्यंत वाटण्यात आले

एलईडी बल्बला योजनेला अधिक प्रोत्साहन देणार

कामगार नियम अधिक सुलभ करणार

स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी दूरदर्शनवरून विशेष कार्यक्रम सुरू करणार

मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी पीपीपी मॉडेल राबवणार

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण राबवणार, उच्च शिक्षणाला चालना देणार

शहरांना जोण्यासाठी उपनगरीय रेल्वेत अधिक गुंतवणूक करणार

स्वच्छ भारत योजना प्रत्येक गावात नेणार

आर्थिक मंदी उपाययोजना ***आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी नक्की वाचा सविस्तर माहिती pdf ई-बुक क्लिक करा आणि वाचा.***

.

विदेशी पुस्तकांवर ५ टक्के सीमा शुल्क भरावे लागणार

संरक्षण उत्पादनांच्या आयातीवरील सीमा शुल्क हटवले

वार्षिक २ कोटींहून अधिक उत्पन्न असणाऱ्यांच्या ३ टक्के तर ५ कोटींहून अधिक वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना ७ टक्के अधिभार भरावा लागणार

१ कोटींहून अधिक रोख रक्कम काढणाऱ्यांना २ टक्के कर भरावा लागणार.

यासारखे महत्वाचे घोषणा आणि आर्थिक तरतुदी करण्यात आल्या.देशातील जनतेचा सारासर विचार करून हा अर्थसंकल्प तयार केला जातो.देशातील सर्व लोकांना त्याचा फायदा व्हावा हा त्यामागचा हेतू असतो.कर रूपातून मिळालेला जनतेचा पैसा जनतेच्या भल्यासाठी वापरावा लागतो.

**श्री.अक्षय जगदीश रांगोळे**

**एम.ए अर्थशास्त्र व्यावसायिक**

**mail id – akshayjrangole77@rediffmail.com**

बचत आणि श्रीमतीचे रहस्य ***वाचा आणि श्रीमत व्हा सविस्तर माहिती pdf ई-बुक क्लिक करा आणि वाचा.***

# तिहेरी तलाक नवीन कायदा

इस्लाम धर्मानुसार निकाह म्हणजे विवाह हा करार असून यात महिला व पुरूष या दोघांच्याही अधिकारांना ग्राह्य मानले गेले आहे. इस्लाममध्ये तिहेरी तलाकला तलाक-ए-सुन्नत असे म्हटले जाते आणि हा तलाक महिला व पुरूषांनी सर्वात शेवटचा, सामोपचाराने घटस्फोट घेण्याचा मार्ग म्हणून इस्लाममध्ये समजला जातो. यात पुरूषाने निकाह केलेल्या महिलेला घटस्फोट देताना एकदा तलाक म्हटल्यावर पुढचा एक महिना म्हणजे एक चांद्रमास थांबणे अनिवार्य आहे. असे तीन महिने ही प्रक्रिया होऊन दरम्यानच्या काळात एकत्र राहण्यावर दोघांची सहमती न झाल्यास अंतिम निर्णय म्हणून तलाक घेतला जातो आणि यामध्ये निकाहच्या वेळी पतीने मान्य केलेली महिलेच्या मेहेरची रक्कम तिचा सन्मान राखून तिला परत देण्याचा प्रघात आहे. इस्लाम धर्मात मुस्लिम महिलांनाही निकाह त्यांच्या दृष्टीने प्रभावी राहीला नाही असे वाटले तर, ‘खुला’ पद्धतीचा उपयोग करून घटस्फोट घेता येतो आणि या पद्धतीत तिला निकाहच्या वेळी मिळालेली मेहेर ती पतीला परत करते.

भारतामध्ये एकाच वेळी तीन वेळा तलाक म्हणून महिलांना ताबडतोब घटस्फोट देण्याची पद्धत अनेक वर्षे चालू असली तरी माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आधुनिक काळात या तलाक देण्याच्या पद्धतीतही बदल झालेले दिसतात. जसे कागदाच्या तुकड्यावर लिहून, फोनवरून, मोबाईल फोनवरून,

एसएमएसद्धारे तलाक देणे, मेल पाठवून अथवा व्हॉट्स अपवरून मेसेज करून तलाक देणे वगैरे. यात असा घटस्फोट हा तात्काळ व पुनर्विचार न करता येण्याजोगा मानला जातो. निकाह या कराराचा असा अव्यवहार्य आणि मुस्लिम महिलांना असुरक्षित करणारा आणि त्यांच्या अधिकारांचे हनन करणारा प्रकार (तलाक-ए-बिद्दत) सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट, २०१७मध्ये अवैध ठरवला.

## २०१९ मध्ये नवीन कायदा करण्यात आला

मुस्लिम महिला (विवाहासंबंधीचे अधिकार अबाधित राखणे) विधेयक २०१९ हे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पुढचे पाऊल आहे. या विधेयकानुसार भारतात आता इस्लाम धर्मातील पुरूषांना कोणत्याही प्रकारे, यामध्ये लेखी किंवा इलेक्ट्रॉनिक अशा कोणत्याही माध्यमाचा उपयोग करून एकाच वेळी तीन वेळा तलाक म्हणून महिलांना घरातून अचानक घटस्फोट देऊन बेदखल करता येणार नाही. कोणत्याही प्रकारे सलग तीन वेळा तलाक म्हणणे हा आता फौजदारी गुन्हा मानला गेला असून त्याबद्दल मुस्लिम पुरूषाला तीन वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. अशा तलाक विरोधात पीडित महिला किंवा तिचे रक्ताचे नातेवाईक वा सासरकडील नातलग यांनी तक्रार दाखल केल्यास पोलीस अधिकारी अशा मुस्लिम पुरूषाविरोधात दखलपात्र गुन्हा दाखल करून त्याची रवानगी तुरूंगात करू शकतो. अशा गुन्ह्यात केवळ न्यायालयाला जामीन देण्याचा अधिकार राहील. पीडित महिलेची बाजू ऐकून जर जामीन देण्याची कारणे समाधानकारक वाटली तर, न्यायालय असा जामीन मुस्लिम पुरूषाला जाहीर करू शकते.

अशा प्रकारे तलाक म्हणणे हा दखलपात्र गुन्हा मानला गेला असून यात दंड व शिक्षा या दोन्हीची तरतुद करण्यात आलेली आहे. या गुन्ह्यातील पीडित महिला व तिच्यावर अवलंबून असणाऱ्या मुलांसाठी आर्थिक साहाय्याची रक्कम न्यायालय निश्चित करेल.

तीन तलाक विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत बहुमताने संमत झाल्यानंतर ३१ जुलै २०१९ रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी या विधेयकावर स्वाक्षरी केली. मुस्लिम महिला (महिला अधिकार संरक्षण कायदा) कायदा, २०१९लागू करण्यात आला.



## काश्मीरचा प्रलंबित प्रश्न ३७० कलम ३५ अ नियम रद्द

जम्मू काश्मीरला घटनेतील 370व्या कलमानुसार विशेष दर्जा देण्यात आला होता. हा दर्जा मागे घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे जम्मू आणि काश्मीर राज्याचे विभाजन करून केंद्रशासित बनवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापैकी जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा असेल मात्र लडाखमध्ये विधानसभा नसेल. जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना विधेयकाला राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी मंजुरी दिली.जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा 2019 या नावाने हा नवा कायदा ओळखला जाणार असून त्याची अंमलबजावणी 9 ऑगस्ट पासून होईल, असं कायदा मंत्रालयाने जारी केलेल्या राजपत्रामध्ये म्हटलं आहे.

### ३७० कलमात काय विशेष होते ?

कलम 370नुसार जम्मू काश्मीरची एक वेगळी राज्यघटना होती. या कलमानुसार सुरक्षा, परराष्ट्र धोरण, अर्थ, दळणवळण या बाबी सोडल्या तर तिथे कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी जम्मू-काश्मीरच्या विधानसभेची संमती असावी लागते. त्यामुळे तिथल्या राहिवाशांसाठी नागरिकत्व, मालमत्तेची मालकी, मूलभूत हक्क या विषयीच्या तरतुदी संपूर्णपणे वेगळ्या आहेत.

जम्मू काश्मीर वगळता भारतातल्या इतर कोणत्याही राज्यातील लोक इथे मालमत्ता विकत घेऊ शकत नव्हते. कलम 370 नुसार केंद्र जम्मू

काश्मीरमध्ये आर्थिक आणीबाणी लादू शकत नव्हते. बाह्यशक्तींनी काही हल्ला केल्यासच तिथे आणीबाणी लागू होऊ शकते. त्यामुळे अंतर्गत समस्यांमुळे राज्यात अशांतता पसरली असेल किंवा धोका निर्माण झाला असेल तर विधानसभेच्या संमतीनंतर तिथे केंद्र सरकारला आणीबाणी लागू करता येते.

केंद्रीय सुचीत किंवा समवर्ती सुचीत ज्या बाबींचा समावेश आहे त्याच बाबी संसदेच्या कार्यक्षेत्रात येतात. तिथे राज्यसुचीतील तरतुदी लागू होत नाही.इतर राज्यांच्या बाबतीत कायदा करण्याचे सर्वोच्च अधिकार संसदेचे असतात. मात्र जम्मू काश्मीरमध्ये हे अधिकार विधानसभेकडे सुरक्षित आहेत.

फुटीरतावादी कृत्य किंवा भारताच्या सार्वभौमत्वाला जिथे धोका असतो ती परिस्थिती या तरतुदीला अपवाद आहेत.प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेचे (अशांतता पसरते आहे असे लक्षात आल्यास काही संशयितांना किंवा समाजकंटकांना अटक करण्यात येते. त्याला प्रतिबंधात्मक स्थानबद्धता असं म्हणतात.) नियम करण्याचे अधिकार जम्मू काश्मीरच्या विधानसभेचे आहेत. त्यामुळे या संदर्भात भारताच्या इतर भागात लागू असलेले नियम इथे लागू होत नाही.

राज्यघटनेची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्यं जम्मू काश्मीरमध्ये लागू होत नाही.विधानसभेने हे कलम रद्द करण्याचा प्रस्ताव संमत केला तरच हे कलम रद्द होऊ शकतं.

# वाहन कायद्यातील नव्या तरतुदी

केंद्र सरकारनं मोटार वाहन कायद्यात सुधारणा केल्या. नव्या सुधारणांसह मोटार वाहन (सुधारणा) कायदा एक सप्टेंबर २०१९ पासून लागू करण्यात आला. या कायद्यातील नव्या तरतुदींमुळं वाहन नियम तोडल्यास होणाऱ्या शिक्षा आणि दंडाच्या रकमेत मोठी वाढ करण्यात आली आहे. दंडाच्या रकमेत वाढ झाल्यानं अपघात कमी होतील. कारण लोक वाहन चालवताना अधिक सतर्क राहतील. शिवाय, सध्याच्या दंड हे जवळपास दशकभर जुने होते, त्यामुळं त्यात बदल करणंही आवश्यक होतेच असे परिवहन मंत्रालयाचे म्हणणे आहे.

## मोटार वाहन सुधारणा कायद्यात काय बदल झाले ?

1. चारचाकी गाडी चालवताना सीटबेल्ट लावला नसल्यास आधी केवळ 100 रूपये दंड आकारला जात होता. आता हा दंड 1000 रूपये करण्यात आलाय.

2. दुचाकी चालवताना हेल्मेट घातला नसल्यास आधी केवळ 100 रूपये दंड आकारला जात होता. आता 1000 रूपये दंड आणि तीन महिन्यांपर्यंत वाहन परवाना रद्द करण्यता येईल.

3. ॲम्ब्युलन्ससारख्या आपत्कालीन वाहनांचा रस्ता अडवल्यास 10 हजार रूपये किंवा त्याहून दंड किंवा तीन महिन्यांचा तुरुंगवासाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षाही ठोठावल्या जातील. याआधी या गुन्ह्यासाठी कोणतीही शिक्षा नव्हती.

4. वाहन चालवताना परवाना नसेल तर 5 हजार रूपये किंवा त्याहून अधिक दंड किंवा 3 महिन्यांचा तुरूंवास किंवा दोन्ही शिक्षा होतील. हाच गुन्हा पुन्हा केल्यास 10 हजार रूपये किंवा त्याहून अधिक दंड किंवा एक वर्षांची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा होतील.

5. परवाना रद्द झाला असतानाही वाहन चालवल्यास 10 हजार रूपये किंवा त्याहून अधिक किंवा 3 महिन्यांचा तुरूंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील.

6. भरधाव गाडी चालवल्यास 5 हजार रूपये किंवा त्याहून अधिक किंवा 3 महिन्यांचा तुरूंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील.

7. अल्पवयीन व्यक्तीनं गुन्हा केल्यास वाहनाच्या मालकाला दोषी ठरवलं जाईल आणि 25 हजार रूपये दंडासोबत 3 वर्षांचा तुरूंवास होईल. शिवाय, गाडीची नोंदणी एक वर्षासाठी रद्द केली जाईल. तसेच, अल्पवयीन आरोपी 25 वर्षांचा होईपर्यंत त्याला वाहन परवाना दिला जाणार नाही.

8. मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्यास 10 हजार रूपये किंवा त्याहून अधिक दंड किंवा 6 महिन्यांचा तुरूंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील. मात्र, हाच गुन्हा पुन्हा केल्यास 15 हजार रूपये किंवा त्याहून अधिक दंड किंवा 2 वर्षांचा तुरुंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील.

9. वाहन चालवताना सिग्नल तोडल्यास 10 हजार ते 5 हजार रूपये दंड किंवा 6-12 महिने तुरुंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील. मात्र, हाच गुन्हा पुन्हा केल्यास 10 हजार रूपये दंड किंवा 2 वर्षांचा तुरुंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील.

10. मोठमोठ्यानं हॉर्न वाजवल्यास पहिल्यांदा एक हजार रूपयांचा दंड आणि पुन्हा हाच गुन्हा केल्यास 2 हजार रूपयांचा दंड आकारला जाईल. याआधी यासाठी शिक्षेची कोणतीही तरतूद नव्हती.

11. वाहनाला विमा संरक्षण नसल्यास दोन हजार रूपयांपर्यंत दंड किंवा तीन महिन्यांचा तुरुंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील. मात्र, हाच गुन्हा पुन्हा केल्यास चार हजार रूपयांपर्यंत दंड किंवा तीन महिन्यांचा तुरुंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील.

12. वाहन चालवताना मोबाईलवर बोलल्यास, चुकीच्या पद्धतीनं ओव्हरटेकिंग केल्यास किंवा रस्त्याच्या विरूद्ध दिशेने वाहन चालवल्यास एक हजार ते पाच हजार रूपये दंड किंवा 6-12 महिने तुरूंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील. हाच गुन्हा पुन्हा केल्यास 10 हजार रूपये दंड किंवा दोन वर्षांचा तुरूंगवास किंवा दोन्ही शिक्षा होतील.

वाहन कायद्यातील नव्या सुधारणांमुळं नियम कडक झाले असले, तरी त्यासोबत वाहन चालकांसाठी या कायद्यात काही समाधानकारक तरतुदीही करण्यात आल्या आहेत. वाहन परवान्याचं नूतनीकरण करायचं असल्यास वर्षभरात कधीही करू शकता. याआधी एक महिन्याच्या आतच वाहन परवान्याचं नूतनीकरण करणं बंधनकारक होतं. वाहन परवान्यासाठी अर्ज आणि वाहन नोंदणी आता राज्यातील कुठल्याही आरटीओमध्ये करता येईल. तसेच, वाहन परवान्याचं नूतनीकरण करायचं असल्यास वर्षभरात कधीही करू शकता.

# राष्ट्रीय नागरिकत्व दुरुस्ती कायदा

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ०९ डिसेंबर रोजी  नागरिकत्व दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडले. नागरिकत्व दुरुस्ती विधेयक आठ तासांच्या वादळी चर्चेनंतर मध्यरात्री लोकसभेत विधेयक मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने ३११ तर विरोधात ८० मते पडली. पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या देशांतून आलेल्या बिगरमुस्लीम निर्वासितांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद या दुरूस्ती विधेयकात आहे.

## या कायद्यात नेमके काय बदलण्यात आले

धार्मिक छळाला कंटाळून पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या देशांतून ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी व ख्रिस्ती समुदायाच्या लोकांना बेकायदा स्थलांतरित मानले जाणार नाही आणि त्यांना भारतीय नागरिकत्व दिले जाईल, अशी तरतूद नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयक २०१९ मध्ये आहे.

## या कायद्यातील कोणत्या अटी बदलण्यात आल्या

सध्या कोणत्याही परदेशी व्यक्तीला भारताचं नागरिकत्व मिळवण्यासाठी भारतामध्ये कमीत कमी ११ वर्ष राहणं आवश्यक आहे. नागरिकत्व दुरुस्ती विधेयकामध्ये ही अट शिथिल करून ती सहा वर्ष करण्यात आली आहे. यासाठी भारतीय नागरिकत्व कायदा, १९५५ मध्ये काही बदल करण्यात आलेत.

ज्यामुळे भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज करणाऱ्यांना कायदेशीररीत्या सोयीचं पडेल.

हे विधेयक घटनाविरोधी असल्याचा आरोप करीत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, इंडियन युनियन मुस्लिम लीग, राष्ट्रीय जनता दल, एमआयएम या पक्षांनी विधेयकाला विरोध केला होता.

**ॲड.श्रीकांत रावसाहेब भोसले.**
**बी.ए.एल.एल.बी. वकिल**
**मु.पो.सासवड ता.पुरंदर जि.पुणे**
**mail id - bhosleshrikant54@gmail.com**

## पुलवामा भ्याडहल्ला आणि हवाई प्रतिउत्तर

जम्मू काश्मीरमधील पुलवामा येथे 14 फेब्रुवारी 2019 रोजी आत्मघाती दहशतवादी हल्ला झाला.त्यात 44 जवान शहीद झाले. जम्मूहून श्रीनगरला जाणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) ताफ्यावर हा भ्याड हल्ला करण्यात आला. देशात जवानांवर झालेला हा आतापर्यंतचा सर्वांत मोठा हल्ला आहे. सीआरपीएफच्या ताफ्यात एकूण 78 वाहने होती आणि त्यातून एकूण 2,547 जवान प्रवास करत होते. जैश-ए-मोहम्मदचा दहशतवादी आदिल अहमद दार उर्फ वक्कास याने लाटूमोड येथे ताफ्यावर 350 किलो आरडीएक्स स्फोटकांनी भरलेली कार धडकवून हा आत्मघातकी हल्ला घडवला होता.

या घटनेच्या जोरदार प्रतिक्रिया उमटल्या. हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला दिलेला mfn (मोस्ट फेव्हर्ड नेशन) हा दर्जा काढून घेतला. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तान स्थित इस्लामिक गट जैश-ए-महंमदने स्वीकारली होती. शहीदांमध्ये महाराष्ट्राचे सुपुत्र राहुल बजरंग करांडे देखील होते.

### हवाई प्रतिउत्तर

१४ फेब्रुवारी २०१९च्या पुलवामा हल्ल्यानंतर भारतीय वायुसेनेने पाकिस्तान व्याप्त काश्मीर मधील बालाकोट शहरावर केलेला हल्ला होता. हा हल्ला २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी करण्यात आला होता. भारतीय

वायुसेनेच्या १२ मिराज २००० जेट विमानांनी नियंत्रण रेषेच्या पलीकडे जाउन बालाकोटजवळील दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला चढवला. भारतीय सैन्यावर पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला उत्तर म्हणून हा हवाई हल्ला करण्यात आलेला आहे असे भारतीय सैन्याने सांगितले. भारताच्या शासकीय संस्थाद्वारे असे सांगितले जात आहे की, भारतीय हवाई दलाने जैश-ए-महोम्मद या आतंकवादी गटाच्या बालाकोट येथील प्रशिक्षण शिबीरावर हल्ला केला आणि त्यात जवळपास ३५० आतंकवादी  ठार झाले. या हवाई हल्ल्यानंतर भारतीय विमाने कोणत्याही अडथळ्याशिवाय भारताच्या भूमीवर परत आलेली आहेत. त्यात भारतीय हवाई दलाला कोणतेही नुकसान  झालेले नाही.

पाकिस्तानच्या सैन्यदलाने असे जाहिर केले आहे की, जेव्हा भारतीय हवाई दलाच्या विमानांनी मुझफराबाद येथे घुसखोरी करून पाकिस्तानच्या सीमेचे उल्लंघन केले. त्यावर पाकिस्तानी विमानांनी उलट जबाबी कारवाई केली आणि भारतीय विमानांना घाईने परतावे लागले. त्या घाईमध्ये भारतीय विमानांनी त्यांचा पे-लोड म्हणजेच जास्तीचे जड सामान आणि इंधन मोकळ्या जागेत सोडून दिले. जरी ते पाकिस्तानच्या भूभागात पडले असले तरी त्यामुळे कोणतीही जिवित वा मालमत्तेची हानी झालेली नाही. याच घटनेबरोबरच भारत-पाक सीमेवर गोळीबारी सुरू झाली होती.

१९७१ च्या भारत-पाक युद्धानंतर दोन्हींही देश अणवस्त्र धारी झाल्यानंतर पहिल्यांदाच भारतीय हवाई दलाने नियंत्रण रेषेच्या पलिकडे जाऊन सैनिकी कारवाई केलेली आहे.

# विंग कमांडर अभिनंदन यांचे शौर्य

27 फेब्रुवारच्या सकाळी झालेल्या हवाई धुमश्चक्रीत एक भारतीय विमान पाकिस्तानात पाडण्यात आलं. भारताचा एक वैमानिक आपल्या ताब्यात असल्याचं पाकिस्तानने सांगितलं आहे, तर आपला एक पायलट बेपत्ता असल्याचं भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानेही स्पष्ट केल होते. वायुसेनेच्या हल्ल्यानंतर पाकिस्तानी लढाऊ विमानांनी भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. या हल्ल्याला भारताने चोख प्रत्युत्तर देत पाकिस्तानचा हा डाव हाणून पाडला होता. या हल्ल्यादरम्यान भारताचे लढाऊ मिग-२१ विमान क्रॅश झाले होते. त्यानंतर ते चालवत असलेल्या विंग कमांडरला पाकिस्तानने ताब्यात घेतले होते. या घटनेनंतर भारताने पाकिस्तानी दूतावासाला बोलावून पायलटला तात्काळ व सुरक्षितपणे भारताकडे सुपूर्द करण्याची मागणी केली.

कमांडर अभिनंदन याना पाकिस्तानी सैन्याने पकडल्यावर त्यांनी धाडस दाखवत सोबत असलेले नकाशे मिटवून टाकले होते. पाकिस्तानी सैन्याने मनोधैर्य खचवून त्यांना प्रश्न विचारले मात्र सगळ्या प्रश्नांची अगदी योग्य प्रकारे उत्तरे देत कोणतीही महत्त्वाची  माहिती सांगितली नाही.

भारताने आक्रमक भूमिका घेतल्याने पाकिस्तानला आणखी हल्ल्याची भीती वाटत होती. त्यामुळे पाकिस्तानच्या ताब्यात असणारे भारतीय हवाई दलाचे विंग कमांडर अभिनंदन यांना भारताच्या स्वाधीन करू अशी घोषणा पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी स्वतः पाकिस्तानच्या  संसदेत केली. विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांची सुटका करण्यात आली.

**- टीम फॉक्स पब्लिकेशन**


जय हिंद जय भारत
"Country Lover"
अविरा
जेन्टस् पार्लर
इंडीयन आर्मी,इंडीयन नेव्ही
इंडीयन एअरफोर्स
सध्या सेवेत असलेल्या
सर्व सैनिकांना सलुनच्या सर्व
सुविधा मोफत मिळतील.
हा उपक्रम ६/१२/२०१७ पासून अखंड सुरु राहील.
कराड रेल्वे स्टेशन,कराड
9225597746

# प्रलंबित रामजन्मभूमी खटला निकाल

वादग्रस्त जागा रामजन्मभूमी असल्याचा निर्णय सुप्रीम कोर्टाने ०९ नोव्हेंबर २०१९ रोजी दिला आहे. तर या प्रकरणातील दुसरे पक्षकार सुन्नी वक्फ बोर्डाला पाच एकर पर्यायी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच या प्रकरणातील तिसरे पक्षकार निर्मोही आखाडा यांचे जागेवरचा दावा फेटाळून लावण्यात आला आहे, असं सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी सांगितलं.

मशिदीच्या भोवतीची जागा भगवान रामाचं जन्मस्थळ आहे, अशी हिंदूंची धारणा पूर्वीपासूनच आहे आणि त्यानुसार ते तिथे पूजाही करत आलेले आहेत, असं अनेक शासकीय नोंदी करणारे गॅझेटिअर तसंच अनेक परदेशी प्रवाशांनी त्यांच्या पुस्तकांमध्ये म्हटलं आहे. अयोध्या येथील वास्तूत १९४९ साली झालेली मूर्तीची प्रतिष्ठापना आणि १९९२ साली झालेल्या वास्तूचा विध्वंस या दोन्ही घटना कायद्याशी विसंगत असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. श्रद्धेला प्राधान्य देताना न्यायालयाने रामलल्ला विराजमानचा म्हणजे रामाच्या मूर्तीचा अर्ज मान्य केला आहे.

यां खटल्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश रंजन गोगोई हे त्या समितीचे अध्यक्ष होते. न्या.

शरद बोबडे, न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. अशोक भूषण आणि न्या. अब्दुल नझीर हे समितीत सदस्य होते.

### न्यायालयाने निकालात कोणत्या महत्वाच्या गोष्टी सांगितल्या

1) अयोध्येत `त्या' वादग्रस्त जागी राममंदिरच होणार
2) मशिदीसाठी सुन्नी बोर्डाला पर्यायी पाच एकर जागा द्या
3) अयोध्येतील जमीन सरकारकडून स्थापित ट्रस्टकडे सोपविली जावी
4) सरकारने मंदिर ट्रस्टची स्थापना पुढील तीन महिन्यांमध्ये करावी
5) बाबरी मशिदीची उभारणी मंदिर पाडून करण्यात आल्याचे पुरावे नाहीत
6) अयोध्या येथील जमिनीत मंदिराचे अवशेष पुरातत्व विभागाला मिळाले
7) केवळ अवशेषांच्या आधारावर जमिनीवर ताबा सांगता येत नाही.
8) तत्कालीन परकी प्रवाशांच्या वर्णनाबाबत सावधगिरी बाळगावी लागेल

**- टीम फॉक्स पब्लिकेशन**

# क्रीडाक्षेत्र

## महिला क्रिकेट संघाची कामगिरी

फेब्रुवारी महिन्यात आयसीसीने महिला वनडे क्रमवारी जाहिर केली आहे. या क्रमवारीत भारताची प्रतिभाशाली फलंदाज स्म्रीती मंधनाने अव्वल क्रमांकावर झेप घेतली आहे. स्म्रीती ही महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील खेळाडू आहे. स्म्रीतीने न्युझीलंड विरुद्ध पार पडलेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यात शतक आणि दुसऱ्या सामन्यात नाबाद 90 धावांची खेळी केली होती. ही मालिका भारतीय महिला संघाने 2-1 अशा फरकाने जिंकली होती.

मंधना मागील वर्षापासून चांगली खेळत असून तीने 2018 पासून 15 वनडे सामन्यात खेळताना दोन शतके आणि 8 अर्धशतके केली आहेत. स्म्रीती फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थान मिळवताना तीन स्थानांची प्रगती केली आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचे एलिस पेरी आणि मेग लिनिंग्स या दोघी अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आल्या आहेत.

मंधना प्रमाणेच जेमिमा रोड्रीगेज या भारताच्या युवा महिला क्रिकेटपटूने 64 स्थानांची मोठी झेप घेत 61 वे स्थान पटकावले आहे. तीने न्यूझीलंड विरुद्ध पहिल्या वनडेत मंधनाला चांगली साथ देताना नाबाद अर्धशतकी खेळी केली होती. तसेच भारतीय महिला वनडे संघाची कर्णधार मिताली राज पाचव्या स्थानावर आहे.

त्याचबरोबर गोलंदाजी क्रमवारीत भारताच्या फिरकीपटू दिप्ती शर्मा, पूनम यादव आणि एकता बिश्त यांची सुधारणा केली आहे.

यादव आणि शर्मा या दोघींनीही प्रत्येकी पाच स्थानांची प्रगती करत पहिल्या दहामध्ये स्थान मिळवले आहे. यादव 8 व्या आणि शर्मा 9 व्या स्थानावर आली आहे. यादवने न्यूझीलंड विरुद्धच्या मालिकेत 6 आणि शर्माने 4 विकेट्स घेतल्या होत्या. तसेच या मालिकेच 5 विकेट्स घेणारी बिश्तने 9 क्रमांकाची प्रगती करत 13 वे स्थान मिळवले आहे. त्याचबरोबर भारताची अनुभवी गोलंदाज झुलन गोस्वामीने पाचव्या स्थानावरुन चौथे स्थान पटकावले आहे.

## भारतीय कर्णधार मिताली राजचा 200वा वन-डे सामना

न्यूझीलंड महिला विरुद्ध भारत महिला संघात 1 फेब्रुवारी तिसरा वनडे सामना पार पडला. भारताने पहिल्या दोन्ही सामन्यात विजय मिळवत 3 सामन्यांची वन-डे मालिका 2-0नेच जिंकली होती. हा सामना भारतीय कर्णधार मिताली राजचा 200वा वन-डे सामना ठरला आहे. हा विक्रम करणारी ती जगातील पहिलीच महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

सर्वाधिक वन-डे सामने खेळण्याचा विक्रम तिने 192वा सामना खेळतानाच मोडला होता. तिच्याआधी इंग्लंडच्या चार्लोट एडवर्ड्सच्या नावावर हा विक्रम होता. तिने 191 वन-डे सामने खेळले आहेत. मितालीने 1999मध्ये आयर्लंड विरुद्ध वन-डेमध्ये पदार्पण करताना नाबाद 114 धावा केल्या होत्या. आत्तापर्यंत तिने

200वनडे सामन्यांत 51.33च्या सरासरीने 6622 धावा केल्या आहेत. यात तिने 7 शतके आणि 52 अर्धशतके केली आहेत.

## हॉकी भारताचा राष्ट्रीय खेळ

नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) 2023 विश्वचषकासाठी भारताची निवड केल्यानंतर भारत सलग दुसऱ्यांदा पुरुषांच्या हॉकी विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करण्यास सज्ज झाला आहे. ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी जाहीर केले की 2023 पुरूष हॉकी विश्वचषक भारतातील भुवनेश्वर आणि राउरकेला या शहरात होईल.

2018 च्या विश्वचषकाच्या सुरुवातीला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या वर्धापन दिनानिमित्त 2023 चा विश्वचषक भुवनेश्वर आणि राउरकेला येथे होईल ही पटनायक यांनी घोषणा केली. ही स्पर्धा 2023 मध्ये 13 ते 29 जानेवारी दरम्यान होईल. भुवनेश्वरने मागील काही वर्षात मोठे आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे, ज्यात 2017 एशियन ॲथलेटिक्स चँम्पियनशिप, 2017 एफआयएच हॉकी वर्ल्ड लीग फायनल्स, 2019 मधील एफआयएच मेन्स सिरिज फायनल्स आणि नुकत्याच पार पडलेल्या एफआयएच हॉकी ऑलिम्पिक क्वालिफायर या स्पर्धांचा समावेश आहे. त्याचबरोबर 2020मध्ये होणाऱ्या 17 वर्षीय फिफा महिला विश्वचषकासाठी भुवनेश्वर हे देखील एक ठिकाण आहे.

## ओडीशाने चौथ्यांदा जिंकली राष्ट्रीय हॉकी स्पर्धा

२०१९ फेब्रुवारी महिन्यात झालेल्या राष्ट्रीय ज्युनीयर हॉकी स्पर्धेत हॉकी ओडिशा विरुद्ध उत्तर प्रदेश हॉकी यांच्यात विजयासाठी निर्धारित वेळेत संघर्षपुर्ण झालेल्या लढतीचा निकाल “बरोबरी’ असा राहिला. पण शुटआऊटमध्ये बाजी मारत हॉकी ओडिशाने चौथ्यांदा राष्ट्रीय ज्युनीयर हॉकी स्पर्धेच्या विजेतपदाला गवसणी घातली. औरंगाबादेतील भारतीय खेळ प्राधिकरणच्या टर्फ मैदानावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

हॉकी हरियाणाने तिसरे स्थान पटकावत मध्यप्रदेश हॉकी अकादमीचा 2-1 ने धूव्वा उडवला. मध्यप्रदेश हैदर अलीने पाचव्या मिनीटांत गोल करुन कमावलेली आघाडी हरियाणाच्या बॉबी सिंग धामी (29 मि.) परमित (39 मि.) यांनी गोल करत ही आघाडी कापुन काढली. हॉकी ओडिशा आणि पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचलेल्या उत्तरप्रदेश हॉकी संघात अंतिम सामना झाला. सामन्याच्या निर्धारीत वेळेत दोन्ही संघांनी 1-1 अशी बरोबरी साधली होती. मात्र शुटआऊटमध्ये झालेल्या संघर्षात हॉकी ओडिशाने 4-3 च्या फरकाने बाजी मारली आणि विजेतपदावर आपले नाव कोरले. सुशांत टोपोच्या 30 व्या मिनीटांतील गोलने हॉकी ओडिशाला आघाडी दिली जी आनंद शिवमने कापुन काढली.

नंतर शुटआऊटमध्ये गेलेल्या या खेळात प्रकाश धीर, सुनील धंवर, लबान लूगुन आणि कर्णधार कृष्णा तिर्कीने गोल करत आघाडी कायम केली. गोपीकुमार सोनकर, अभिषेक कुमार सिंग आणि विष्णु सिंग यांनी उत्तरप्रदेशकडुन ओडिशाची आघाडी कापण्याचा प्रयत्न केला.

## साऊथ एशियन गेममध्ये भारताची दमदार कामगिरी

नेपाळमध्ये सुरु असलेल्या दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघ ३१२ पदकासह सर्वात अव्वलस्थान पटकावले आहे. भारताने विविध खेळ प्रकारात १७४ सुवर्ण, ९३ रौप्य आणि ४५ कांस्य पदकाची कमाई केली. यजमान नेपाळ २०६ पदकांसह पदतालिकेत तिसऱ्या स्थानावर असून श्रीलंका संघ २५१ पदकासह दुसऱ्या स्थानावर आहे. नेपाळच्या खात्यात ५१ सुवर्ण असून श्रीलंकेच्या खात्यात ४० सुवर्ण जिंकली आहेत.

या स्पर्धेत अॅथलेटिक्समध्ये भारताने दमदार कामगिरी केली.भारतीय बॅडमिंटनमध्येही चांगली कामगिरी पाहायला मिळाली. महिला आणि पुरुष एकेरीमध्ये भारतीय खेळाडूंनी सुवर्ण कामगिरी केली.

बॅडमिंटन खेळ प्रकारात ६ सुवर्ण, २ रौप्य आणि २ कांस्य पदकासह भारताच्या खात्यात एकूण १० पदके मिळाली आहेत. महिला आणि पुरुष एकेरीत भारताने सुवर्ण कामगिरीसह टेबल टेनिसमध्ये भारताला ७ सुवर्ण, ५ रौप्य पदकासह एकूण १२ पदके मिळवली आहेत.

## क्रिकेट विश्वचषक २०१९

२०१९ क्रिकेट विश्वचषक ही जागतिक क्रिकेट स्पर्धा क्रिकेट विश्वचषकातील १२वी स्पर्धा इंग्लंड आणि वेल्समध्ये ३० मे ते १४ जुलै २०१९ दरम्यान खेळण्यात आली. १९ मेच्या संध्याकाळी सुप्रसिद्ध लंडन मॉलमध्ये उद्घाटन सोहळा पार पडला. अँड्रु फ्लिन्टॉफ, पॅडी मॅक्गिनीस आणि शिबानी

दांडेकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. दहा सहभाग घेणाऱ्या संघांमध्ये ६० सेकंदांची एक स्पर्धा खेळवली गेली होता. प्रत्येक संघाचे प्रतिनिधीत्व प्रत्येकी दोन पाहूण्या व्यक्तींनी केले, ज्यांमध्ये विव्ह रिचर्ड्स, महेला जयवर्धने, जॅक कॅलिस, ब्रेट ली, केव्हिन पीटरसन, अनिल कुंबळे, फरहान अख्तर, मलाला युसूफझाई, योनान ब्लेक, दमयंती धर्शा, अझहर अली, अब्दुर रझ्झाक, जेम्स फ्रँकलिन, स्टीव्ह पियानार, ख्रिस ह्यूजेस आणि पॅट कॅश यांचा समावेश होता. तर डेव्हिड बून हे पंच होते. इंग्लंडने ७४ गुणांसह हा खेळ जिंकला आणि ६९ गुणांसह ऑस्ट्रेलिया दुसऱ्या स्थानावर राहिली.

मागच्या स्पर्धेतील विजेत्या ऑस्ट्रेलियाचा त्यावेळचा कर्णधार मायकेल क्लार्क याने इंग्लंडचा माजी ऑफस्पिनर ग्रॅमी स्वान याच्यासोबत विश्वचषक ट्रॉफी मंचावर आणली.लॉरीन आणि रुडिमेंटलने सादर केलेल्या "स्टँड बाय" ह्या अधिकृत विश्वचषक गाण्याने सोहळा संपला.

आजार मोठे उपचार छोटे - ***घरोघरी असणारे ब्लडप्रेशर, डायबेटीस, कॅन्सर आणि पॅरालिसिस आजाराची माहिती देणारे एकमेव मराठी ई-बुक. सविस्तर माहिती pdf ई-बुक क्लिक करा आणि वाचा.***

## वर्ल्ड कप २०१९मधील भारताची कामगिरी

भारतीय संघाने एकूण सर्व सामान्यात अत्यंत कौतुकास्पद कामगिरी केली. भारतीय संघ गुणतालिकेत कायम प्रथम क्रमांकावर राहिला.एकूण ९ सामान्यामध्ये ०७ विजयी ०१ पराभव आणि ०१ सामना अनिर्णित राहिला.भारतीय संघ १५ पॉइंट मिळवत प्रथम राहिला. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील उपांत्य फेरीतील सामना अत्यंत अटीतटीचा झाला. सामन्याच्या अखेरच्या षटकापर्यंत हा सामना कोण जिंकेल, हे सांगता येत नव्हते. त्यानंतर रवींद्र जडेजा आणि महेंद्रसिंगधोनी यांनी अखेरच्या षटकांमध्ये सामन्यात रंग भरले. पण जडेजा आणि धोनी यांना भारताला विजय मिळवून देता आला नाही. भारताचे आव्हान उपांत्य फेरीत संपुष्टात आले.

उत्तम अष्टपैलू खेळाडू कसा असावा, याचा नमुना रवींद्र जडेजाने न्यूझीलंडविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात दाखवून दिला. कारण जडेजाने चांगील गोलंदाजी केली, उत्तम क्षेत्ररक्षण केले आणि लाजवाब फलंदाजी करत त्याने भारताच्या बाजूने सामना झुकवण्याचा प्रयत्न केला. जडेजा आणि धोनी यांनी शतकी भागीदारी रचली आणि भारताचे आव्हान जीवंत ठेवले.

न्यूझीलंडच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरुवात दयनीय झाली. भारताने आपले पहिले तिन्ही फलंदाज फक्त पाच धावांमध्ये गमावले होते. रोहित शर्मा, विराट कोहली आणि लोकेश राहुल यांना प्रत्येकी एक

धावच करता आली. त्यानंतरही दिनेश कार्तिकही स्वस्तात बाद झाला. पण त्यानंतर रिषभ पंत आणि हार्दिक पंड्या यांनी काही काळ फलंदाजी करत भारताला स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पण दोघांनीही ऐन वेळी कच खाल्ली. स्थिरस्थावर झाल्यावर मोठे फटके मारण्याच्या नादात या दोघांनी आपली विकेट गमावली. पण त्यानंतर मात्र महेंद्रसिंग धोनीसह रवींद्र जडेजा यांनी डावाची उत्तम बांधणी करत सामना रंगतदार अवस्थेत आणला. जडेजाने ५९ चेंडूंत प्रत्येकी चार षटकार आणि चौकार लगावत ७७ धावा केल्या. धोनीनेही ५० धावांची खेळी साकारली.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना पावसामुळे राखीव दुसऱ्या दिवशी  खेळवण्यात आला. न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना 46.1 षटकांत 5 बाद 211 धावा केल्या. त्यानंतर पावसानेच दमदार बॅटींग केली. बराच वेळ वाट पाहूनही पावसाचा जोर कायम राहिल्याने अखेरीस उपांत्य फेरीचा सामना राखीव दिवशी खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला. आज 46.1 षटकापासूनच सामन्याला सुरुवात झाली. न्यूझीलंडने भारतासमोर 240 धावांचे लक्ष्य ठेवले. कर्णधार केन विलियम्सन आणि रॉय टेलर यांनी अर्धशतकी खेळी केली. विलियम्सनने 95 चेंडूंत 67 धावा केल्या. टेलरने 90 चेंडूंत 74 धावा केल्या.

खेळ सुरू झाला तेव्हा किवी मोठी धावसंख्या उभारतील असे वाटले होते, परंतु रवींद्र जडेजानं त्यांना रोखले. रॉस टेलरला धावबाद केल्यानंतर जडेजानं किवींना आणखी एक धक्का दिला, भुवनेश्वर कुमारच्या गोलंदाजीवर त्यानं टॉम लॅथमचा सुरेख झेल टिपला. त्यामुळे किवींना फार काही करता आले नाही. भुवीनं 10 षटकांत 43 धावा देत तीन विकेट घेतल्या.

कोहली झाला तिसऱ्यांदा उपांत्य फेरीत फेल न्यूझीलंड विरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताचा कर्णधार विराट कोहलीला फक्त एक धावच करता आली. आतापर्यंत विश्वचषकात कोहलीने सलग पाच अर्धशतके झळकावत विक्रम केला होता. कोहलीने उपांत्य फेरीसाठी शतक राखून ठेवले आहे, असे त्याचे चाहते म्हणत होते.

कोहली पहिल्यांदा विश्वचषकात खेळला तो २०११ साली. या विश्वचषकात भारताचा उपांत्य फेरीतील सामना पाकिस्तानबरोबर मोहाली येथे खेळवण्यात आला होता. या सामन्यात ९ धावा करता आल्या होत्या. त्यानंतर २०१५ साली झालेल्या विश्वचषकाच्या अंतिम फेरीत भारताची गाठ ऑस्ट्रेलियाशी पडली होती. त्यावेळी कोहलीला फक्त एकच धाव करता आली होती.

**श्री.आकाश विठ्ठल काटवटे.**
**बी.ए. (राज्यशास्त्र)**
**व्यावसायिक**
**८६००३४०१७३**
**मु.पो.वाठार बु.ता.खंडाळा जि.सातारा**


कृष्णा किड्स वेअर
नवजात बालकापासून ते
१३ वर्षापर्यंत
मुला मुलींचे
नामवंत कंपन्यांचे व
फॅन्सी कपडे मिळतील.
राधा
लेडिज गारमेंट
जॉकी, बॉडी केअर, इनामोट, चार्मिज इ. कंपनीचे इनरवेअर व निककीज,
झोला कंपनीचे कुर्तीज, लेगीन्स, ओढणी, नाईटवेअर मिळतील.
एकदा अवश्य भेट द्या!
पत्ता: लोणंद– सातारारोड, स्वामी समर्थ हॉस्पिटलशेजारी,
लोणंद ता. खंडाळा, जि.सातारा
मोबा. : ९८९०७६३८९९ / ९८८१६१४०९१

# विज्ञान-तंत्रज्ञान

## चांद्रयान २ भारताची अवकाशातील महत्वपूर्ण आणि महत्वकांशी मोहीम

२२जुलै २०१९

चांद्रयान २ ही मोहीम चंद्रयान १ नंतरची भारताची दुसरी चंद्रमोहीम आहे. हे यान इस्रोने बनवले असून, ते २२ जुलै, २०१९ रोजी श्री हरीकोटा अवकाश केंद्रातून भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यान मार्क ३ (GSLV MK III -M1) द्वारे प्रक्षेपित करण्यात आले. या यानात कक्षाभ्रमर (Orbiter), लँडर ( Lander) व रोव्हर (Rover) यांचा समावेश असून हे सगळे भारतात विकसित करण्यात आले आहेत.

१२ नोव्हेंबर २००७ रोजी, रशियन सांघिक अवकाश संस्थेच्या व इस्रोच्या प्रतिनिधींनी 'चांद्रयान २' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर एकत्र कार्य करण्याचा करार केला होता. या प्रकल्पात इस्रोने कक्षाभ्रमर, रोव्हर तर रशियन सांघिक अवकाश संस्थेने लँडर तयार करण्याची मुख्य जबाबदारी स्वीकारली होती. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली १८ सप्टेंबर २००८ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत भारत सरकारने या मोहिमेला मंजुरी दिली. ह्या यानाचा आराखडा दोन्ही देशांतील वैज्ञानिकांच्या एकत्रित बैठकीने ऑगस्ट २००९ मध्ये पूर्ण करण्यात आला. इस्रोने या यानावरील भार (payload) वेळापत्रकाप्रमाणे निश्चित केला, मात्र ही मोहीम जानेवारी २०१३ पर्यंत स्थगित करून पुन्हा २०१६ साली करण्याचे ठरवले. कारण रशियन सांघिक अवकाश संस्थेला लँडर वेळेत पूर्ण करणे शक्य नव्हते.

२०१६ असणाऱ्या मोहिमेकरिता २०१५ पर्यंत सुद्धा रशियन अवकाश संस्थेला हा लँडर, काही अंतर्गत तांत्रिक अडचणींमुळे पूर्ण करणे शक्य झाले नाही. मग मात्र भारताच्या इस्रो संस्थेने ही चांद्रमोहीम स्वतंत्रपणे पार पाडायचे निश्चित केले. या सर्व गोष्टींची पूर्तता झाल्यानंतर मार्च २०१८ ला चांद्रयानाचे प्रक्षेपण करण्याचे नक्की करण्यात आले. मात्र सुरुवातीला एप्रिलपर्यंत आणि नंतर ऑक्टोबरपर्यंत काही अन्य अंतराळ वाहनांची चाचणी करण्याकरिता ही मोहीम स्थगित करण्यात आली. २०१९ च्या पहिल्या अर्धवर्षात ह्या मोहिमेच्या चौथ्या सर्वसमावेश तांत्रिक चर्चामंडळाच्या सभेनंतर यानाच्या संरचनेत व अवतरण क्रमात काही बदल करण्यात आला.

फेब्रुवारी २०१९ च्या चाचणीत, लँडरच्या दोन पायांना अल्पप्रमाणात हानी पोहोचली होती. ती दुरुस्ती झाल्यावर चांद्रयान २ चे प्रक्षेपण १४ जुलै २०१९ ला ठरवण्यात आले. मात्र पुन्हा काही तांत्रिक गोंधळामुळे प्रक्षेपण पुढे ढकलण्यात आले. शेवटी १८ जुलै रोजी, इस्रोने २२ जुलै २०१९ हा दिवस चांद्रयानाच्या प्रक्षेपणासाठी जाहीर केला.चंद्रयान २ 'GSLV MK III' ह्या प्रक्षेपकाद्वारे नियोजित वेळापत्रकाप्रमाणे २२ जुलै २०१९ रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी २:४३ वाजता प्रक्षेपित झाले.

७ सप्टेंबर २०१९ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार १:५२ वाजता हे यान उतरत असताना चंद्रतलापासून २,१०० मीटर उंचीवर होते, त्यावेळी यानाशी संपर्क तुटला. हे यान कोसळले असल्याची शक्यता आहे.इस्त्रो' ची महत्त्वाकांक्षी मोहीम असलेल्या 'चांद्रयान - २' च्या अखेरच्या टप्प्यात चांद्रभूमीपासून केवळ २. १ कि. मी. उंचीवर असतांना विक्रम लँडरशी संपर्क तुटल्याने देशभरातील खगोलप्रेमींना आणि भारतीय शास्त्रज्ञांना धक्का बसला.

८ सप्टेंबर २०१९ - विक्रम लँडरशी संपर्क तुटल्यानंतर देशभरातील खगोल प्रेमींमध्ये निराशेचे वातावरण पसरलेले असतांनाच आज पुन्हा एकदा आशेचा किरण सापडला. ऑर्बिटरच्या माध्यमातून विक्रम लँडरची थर्मल छायाचित्रे मिळाली आहेत. मात्र 'विक्रम' शी अद्याप संपर्क झाला नसून तो प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

चांद्रयानच्या ऑर्बिटरने काढलेल्या एका छायाचित्रात 'विक्रम' चंद्राच्या पृष्ठभागावर सापडल्याचे दिसून आल्याचे के. सिवन, प्रमुख, इस्त्रो यांनी सांगितले आहे. यामुळे सर्वांचेच मनोबल पुन्हा उंचावले आहे.भारताच्या अवकाश कार्यक्रमाचे जनक डाँ. विक्रम साराभाई यांच्या गौरवार्थ लँडरचे 'विक्रम' असे नामकरण करण्यात आले आहे.

११ सप्टेंबर २०१९ - चांद्रयान २ मोहिमे दरम्यान संपर्क तुटून चंद्रावर पडलेल्या विक्रम लँडरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरु असून त्यात अद्याप यश मिळालेले नाही. 'विक्रम ' सापडल्याचे आणि तो चांद्रभूमीवर तिरपा पडल्याचे छायाचित्रातून स्पष्ट होत असल्याचे 'इस्त्रो' ने सांगितले. विक्रम लँडरच्या आत प्रग्यान बग्गी असून तिलाही बाहेर पडत आलेले नाही. या बग्गीद्वारे चंद्राच्या पृष्ठभागाचा अभ्यास केला जाणार होता.

**……..टीम फॉक्स पब्लिकेशन**

# नवीन मोबाईल २०१९

## Vivo V17Pro

पॉप अप सेल्फी कॅमेरासाठी प्रसिद्ध असलेला **Vivo** V17Pro २० सप्टेंबर २०१९ रोजी बाजारात आला आणि देशातील तरुणाईला वेड लावले. 128GB 8GB RAM आणि जास्त काळ टिकणारी 4,100mAh battery हा खूप चर्चेत राहिला.

## Apple iPhone mobail

२० सप्टेंबर २०१९ रोजी ॲपलने हे मोबाईल बाजारात आणले.**आयफोन ११ प्रो** आणि **आयफोन ११ प्रो मॅक्स** हे ॲपल इंक द्वारे डिझाइन, विकसित आणि मार्केटींग असलेले स्मार्टफोन आहेत. ते आयफोनच्या १३ व्या पिढीतील फ्लॅगशिप आहेत. आयफोन एक्सएस मधील महत्त्वपूर्ण बदल म्हणजे मॉडेलमध्ये नवीन ट्रिपल-लेन्स रियर कॅमेरा सिस्टम आणि नवीन ए १३ बायोनिक चिप.

**आयफोन ११** १२८जीबी ची किमत भारतीय बाजारात ६९००० रुपये आणि **आयफोन ११ प्रो मॅक्स** ६४जीबी ची किमत भारतीय बाजारात १०९९०० रुपये एवढी आहे.

**Nokiya**

**नोकिया** या mobail क्षेत्रातील अनुभवी कंपनीने बाजारात आपले पाय २०१९मध्ये रोवले.नोकियाने android फोन बाजारात आणत आपली मार्केट मध्ये री-एन्ट्री मारल्याची पहायला मिळाली.

**……..टीम फॉक्स पब्लिकेशन**



# Tik-tok व्हिडिओ मोबाईल ॲप

टिक टॉक ॲपला भारतात संकटांचा सामना करावा लागला. टिक टॉक हे चीनचं शॉर्ट व्हिडिओ मोबाईल ॲप आहे. भारतामध्ये 'टीक टॉक' ॲपचा गैरवापर होत असून यूजर्स लहान-लहान व्हिडीओद्वारे अश्लिल मजकूर अपलोड करत असल्याचा आरोप आहे. त्यामुळं या ॲपवर तात्काळ बंदी आणावी यासाठी मद्रास हायकोर्टानं एक याचिका दाखल करण्यात आली होती. मद्रास हायकोर्टानं आपल्या निर्णयात ॲपवर बंदी आणली. या बंदीविरोधात सुप्रीम कोर्टात अपील करण्यात आलं आहे. सुप्रीम कोर्टानं मात्र बंदीवर स्थगिती आणण्यास नकार दिला होता. म्हणूनच मद्रास कोर्टाच्या निर्णयाचा आधार घेत सरकारनं हे ॲप प्ले स्टोअरमधून काढून टाकण्याचे आदेश गूगल आणि ॲपलला दिले होते.मात्र ते आदेश मागे घेण्यात आले.

टिक टॉक ॲप काढून टाकण्यासंदर्भातील हे पाऊल माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून उचललं गेली. मंत्रालयानं सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर हे पाऊल उचले होते, ज्यात मद्रास हायकोर्टाच्या निर्णयावर स्थगिती देण्यास सुप्रिम कोर्टानं नकार दिला होता . याप्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठात सुरू आहे.मंत्रालयाच्या आदेशानंतर हे ॲप डाऊनलोड करता येऊ लागले. ज्या लोकांनी पहिल्यापासून हे ॲप डाऊनलोड केलंय, त्यांनी या ॲपचा वापर करू नये, असं सांगण्यात आलं आहे होते.

या प्रकरणातील एका व्यक्तीनं सांगितलं, ‘हायकोर्टानं सरकारला टिक टॉक ॲपवर बंदी घालण्यास सांगितले होते. मंत्रालयानं त्यानुसार गूगल आणि ॲपलला ॲप स्टोअरमधून हे ॲप डिलीट करण्यास सांगितले होते. आता हे कंपनीवर अवलंबून आहे की, ते सरकारचे आदेश पाळतात की कोर्टाच्या आदेशाची वाट बघतात’. मद्रास हायकोर्टानं ३ एप्रिलला टिक टॉक ॲपवर बॅन लावण्यास सांगितलं होतं.

एव्हढंच नव्हे तर कोर्टानं मीडिया कंपन्यांना सुद्धा टिक टॉक ॲपचे व्हिडिओ टेलिकास्ट करण्यास नकार दिला होता.बाइटडांसचे वकील अभिषेक मनु सिंघवीनं बॅनवर स्टे ची मागणी केली आणि यामुळं कंपनीच्या इमेजचं नुकसान होत असल्याचं म्हटलं. टिक टॉक या ॲपचा मालकी हक्क बाइटडांस जवळ आहे.

**……..टीम फॉक्स पब्लिकेशन**



# ग्राफिक्स गेम

pubg गेमच वेड २०१९ मध्ये तरुणांना लागलेले पहायला मिळाले.मात्र ह्या पब्जी गेमचा इतिहास आपण जाणून घेऊ.

## चिकन डिनर

ही 'घोषणा' सध्या जिकडे तिकडे ऐकू येते. पब्जी खेळणारे भाईबंद एकत्र आले म्हणजे तिथे विनर विनर चिकन डिनरचा जयघोष झालाच म्हणून समजा. टिकटॉकवर सुद्धा या चिकन डिनरच्या व्हिडिओजचा पाऊस पडत असतो. तर मित्रहो या गेममध्ये शेवट पर्यंत टिकणे आणि जिंकणे हे खुप रोमांचक आहे. शेवटपर्यंत टिकल्यावर जेव्हा विनर विनर चिकन डिनरचा मेसेज स्क्रिनवर दिसतो तर काय वर्णावा तो आनंद. पोरांना आकाश ठेंगणे झालेले असते.

## पब्जीची सुरुवात कोठे झाली ?

तर पब्जीचा फुलफॉर्म आहे Player unknown battleground हे नाव खुप विचारपूर्वक ठेवले आहे. कारण युध्दभूमीवर अनोळखी असलेले खेळाडू एकमेकांना मारण्यासाठी उतरतात. तुम्हा सर्वांना कामाला लावणारा म्हणजेच पब्जीची निर्मिती करणारा अवलिया कोण आहे माहितीये? त्याचे नाव आहे ‘ब्रँडन ग्रीन.

मुळचा आयर्लंडचा असणारा हा ब्रँडन ग्रीन सुरुवातीपासून शूटिंग आणि मारामारीच्या गेम्सचा फॅन होता. सुरुवातीला आर्मा नावाचा गेम खेळत असणारा ब्रँडन

नंतर आर्मा 3 या गेमवर काम करू लागला हा पण पब्जी सारखाच battleground वर खेळला जाणारा गेम आहे. पण या भाऊचं नशीब तेव्हा चमकलं जेव्हा याला दक्षिण कोरियाची गेमिंग कंपनी ब्लुहोलने कामासाठी बोलावले. या कंपनीचा दहा वर्षापासून बॅटल गेम बनवण्याचा प्रयत्न सुरु होता. या कंपनीला जेव्हा ब्रँडनच्या आर्माबद्दल माहिती झाली तेव्हा त्यांनी ब्रँडनला बोलावून घेतले, आणि अश्याप्रकारे पब्जी बनण्याची सुरुवात झाली. हा गेम एका 'बॅटल रॉयल' नावाच्या जपानी सिनेमापासून प्रेरित आहे. पब्जीचे पीसी वर्जन 23 मार्च 2017 ला बाजारात आले. पण या गेमने एका वर्षात सगळे रेकॉर्ड तोडले. हा गेम खरतर तेव्हा प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचला जेव्हा फेब्रुवारी 2018 ला याचे मोबाईल वर्जन सुरू करण्यात आले. मोबाईल वर्जन बाजारात आल्याच्या काही महिन्यानंतर हा गेम प्ले स्टोरवर नंबर वन वर पोचला.

## पब्जीचे रेकॉर्ड

या गेमने लाँच झाल्याच्या दिवसापासून अनेक रेकॉर्ड तोडले पण आणि नवीन रेकॉर्ड बनवले पण. सुरुवातीला पब्जी लाँच झाला तेव्हा दोन महिन्याच्या आत त्याच्या 20 लाख कॉपीज विकल्या गेल्या होत्या. या गेमने पहिल्या तीन महिन्यांमध्ये कमावलेला आकडा ऐकून तुमची बोटं तोंडात जातील, तर हा आकडा आहे तब्बल ७० कोटी रुपये !! एवढेच नाही, तर या गेमने जगातल्या सर्वात जास्त विकल्या गेलेल्या गेम्समध्ये पाचवा क्रमांक पटकावला आहे आणि येणाऱ्या काळात तुमच्या आशीर्वादाने पब्जी जगातला सर्वात जास्त विकला जाणारा गेम ठरणार आहे. प्ले स्टोरवरील सर्वात जास्त वाढत्या डाउनलोडिंग मध्ये पब्जी पहिल्या क्रमांकावर आहे.

पब्जी एकमात्र असा गेम आहे जो एकासोबत अनेक लोकं ऑनलाइन राहून खेळू शकतात. एकासोबत एक नाही दोन नाही तर तब्बल तेरा लाख

लोकं एकत्र खेळल्याचा रेकॉर्ड पब्जीचा आहे. तुमच्या आमच्या सारखी जगभरात रोज 1 कोटीहुन जास्त लोकं हा गेम खेळत असतात. लाँच झाल्याच्या चार महिन्यात हा गेम खेळत असल्याची संख्या दहा कोटी होती, आतातर ती 50 कोटींच्या पलीकडे गेली आहे.

## निर्मिती आणि कमाई किती?

ज्या पब्जीवर तुम्ही दिवसरात्र मेहनत करत असतात आणि ज्यांनी पब्जीची निर्मिती करून तुम्हाला कामाला लावले ते या पब्जीच्या माध्यमातून किती कमवत असतील याची उत्सुकता तुम्हाला निश्चितच असेल, पण पब्जीने अजूनपर्यंत तरी त्यांची कमाई उघड केलेली नाही. परंतु मागच्या वर्षीची फेब्रुवारी महिन्याची कमाई त्यांनी उघड केली होती. तर त्या एका महिन्याची कमाई होती तब्बल 721 कोटी रुपये! अवाक झाले ना?

ही फक्त एका महिन्याची कमाई आहे आणि दिवसेंदिवस पब्जीवर ऑनलाइन राहणाऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. म्हणजेच पब्जीच्या कमाईची सरासरी पण वाढत आहे. तर एका वर्षात पब्जी किती कमाई करत असेल याचा अंदाज तुम्ही लावून बघा.

## पुरस्कार विजेती पब्जी

Pc game of the year
multiple game award
Action game of the year
यासारखे अनेक पुरस्कार तुमच्या लाडक्या पब्जीला मिळालेले आहेत.

**या पब्जी गेमच्या व्यसनामुळे अनेक तरुणांनी आपला जीव गमावले बातम्या पहायला मिळाल्या.**

**हैदराबाद** – ०३ एप्रिल २०१९

पब्जी गेम खेळताना आई ओरडली. त्यामुळे 10 वीतल्या विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**कोल्हापूर** – १५ सप्टेंबर २०१९

पब्जीमुळे तरुणाची मानसिक अवस्था बिघडली, उपचारादरम्यानही गेमबाबतच बडबड करत होता.

**.........टीम फॉक्स पब्लिकेशन**


Vijay Digital
PHOTOGRAPHY
हॉटेल
मोरया
“जीवाला जीव दयारांच कौतुक राहुदे
खरा मित्र असशील तर पार्टी दे ”
ती पण हॉटेल मोरया ,मादे मध्ये
अनलिमिटेड थाळी
चिकन थाळी : १३०
मच्छी थाळी : १३०
मटण थाळी : १८०
व्हेज थाळी : १२०
चिकन,मटण ,मासे व तंदुर ऑडरप्रमाणे बनवून मिळेल.
हॉटेल मोरया
सचिन चव्हाण ७७०९९०३४०९
वाटार कॉलनी फाटयाजवळ,भादे. ता.खंडाळा जि. सातारा.

# संस्था परिचय

## जयहिंद फाउंडेशन “सैनिक हो तुमच्यासाठी”

जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी देश हाच पहिल्यास्थानी असतो;परंतु आपण आपल्या आचरणात पहिला धर्म नंतर देव आणि शेवटी आठवल तर देश असतो.आज पर्यंत जे झाल ते झाले.निदान आता तरी आपल आचरण हे देश,देव आणि धर्म अश्या पधतीने करून देशाचे रक्षण करणारे सैनिक हे अप्रत्यक्षपणे आपलेच रक्षण करत असतात आणि आपण जाणतोच कि जो रक्षण करतो तोच देव असतो.बाकी आपण सगळे सुजाण आहात.

जवान शहीद झाल्यानतर त्यांच्या कुटुंबियांना अनेक अडचणीना तोंड द्यावे लागते.मग अश्यावेळी या कुटुंबाच्या पाठीशी कोणीतरी आपलेपणाने पाहणारे पाहिजे.त्यासाठी जयहिंद फाउंडेशन ह्या संस्थेची स्थापना करण्यात आली. देशासाठी बाजी लावणाऱ्या सैनिकांना जो मान-सन्मान मिळायला हवा तो त्यांना दिलाच पाहिजे त्या साठी समाजमन तयार करणे.

सैनिकांप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव, सांगून नव्हे तर आपल्या मनातून यायला हवी, या साठी जनजागृती करणे.

होय, सीमेवर लढताना मागे आपल्या कुटुंबाची काळजी घ्यायला लाखो करोडो बांधव आहेत, अशी सुरक्षिततेची भावना सैनिकांच्या मना मध्ये तयार करणे, नव्हे नव्हे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्यच आहे, याची जाणीव समाजमनात तयार करणे.

## जयहिंद फाउंडेशन या संस्थेची उद्दिष्टे.

१. समाजात जनजागृती करून लोकांच्या मनात देशासाठी आपण काही तरी केलं पाहिजे अशी भावना निर्माण करणे, आपल्या दिवसातील २४ तासाच्या वेळेत देशासाठी किमान ३० मिनिटं तरी वेळ काढून देशाच्या भल्यासाठी विचार करणे आणि त्या नुसार कृती करणे.

२. देशाने आपल्या साठी काही तरी करावं हि सर्व साधारण सर्वांचीच अपेक्षा असते, पाहिलं आपण देशासाठी काही करतो का ? हा प्रश्न स्वतःला विचारण्यास लोकांना भाग पाडणे. या माध्यमातून लोकांच्या मनात देश प्रेम निर्माण करणे, सर्व सामान्य लोकं आप आपल्या कार्यात मग्न असतात त्यांना जाणीवपूर्वक या गोष्टींची जाणीव करून देणे.

३. देश रक्षणा करता शहीद झालेल्या सैनिकांची आणि त्यांच्या कुटुंबाची सामाजीक प्रतिष्ठा वाढवणे, सैनिकांच्या प्रती सर्वांच्या मनात सन्मानाची भावना तयार करणे.

४. समाज आणि शहीद कुटुंबाची, जस जसे वेळ पुढे जाईल तशी दरी वाढतं जाते, हि दरी कमी करणे, तसेच सेवेत असलेल्या सैनिकांच्या प्रती आदर तसेच सन्मान भावना तयार करने.

५. तालुका पातळीवर संस्थेचे कार्यकर्ते मासिक, त्रैमासिक सर्व शाळा शाळा मधून मुलांना देशभक्तीच्या गोष्टी तसेच लिखित, अलिखित देशाच्या अभिमानाच्या इतिहास बद्दल माहिती, देशाची संस्कृती, संस्कार या बद्दल

माहिती सांगून मुलांच्या मध्ये देशभक्ती, देश प्रेम निर्माण करणे, कारण आपल्या देशाचं उद्याचं भवीष्य हि शाळेतील मुलंच आहेत.

६. जे तरुण सैनिक म्हणून देशसेवेत रुजू झाले असतील त्यांना त्या त्या भागातील संस्थेचे सभासद शुभेचछा देऊन देश सेवेसाठी प्रेरीत करतील तसेच जे सैनिक देश सेवा करून निवृत्त झाले असतील त्यांचा बहुमान करणे, तसेच ज्या तरुणांना सैन्यात भरती व्हावे अशी इचछा असेल त्यांना प्रेरणा, मार्गदर्शन, तसेच आवश्यक असणारे सहकार्य करणे.

७. शहिदांच्या कुटुंबाना येणाऱ्या शासकीय पातळीवर तसेच स्थानिक पातळीवर येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्याचा प्राधान्याने प्रयत्न करणे.

८. शहिदांच्या मुलांना / मुलींना शैक्षणिक, उच्च शिक्षण तसेच त्यांच्या पुढील उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन तसेच कृतिशील आराखडा तयार करून सहकार्य करणे,

९. जिल्हयात वेग वेगळ्या ठिकाणी अनेक सामाजिक संस्थांच्या माध्यमातून, (रोटरी क्लब, लायन्स क्लब, सामाजिक संस्था, तसेंच या क्षेत्रातील तज्ञ ) सैन्य भरती पूर्व मार्दर्शन, तसेच प्रशिक्षणं केंद्र सुरु करणे.

१०.जिल्ह्या जिल्हयात सर्व शाहिद झालेल्या कुटुंबाचा स्नेहमेळावा आयोजित करणे, ज्या मध्ये सर्व सामान्य लोक देखील सहभागी असतील. त्यामुळे त्या कुटुंबाची आणि समाजाची नाळ तुटणार नाही. तसेंच नुकतेच शहीद झालेल्या कुटुंबाच्या बरोबर येणारे सण साजरे करणे त्यामुळे, थोडी का होईना त्यांच्या दुःखावर फुंकर घातली जाईल.

११.जयहिंद हि संस्था दिवसातील २४ तास सैनिकांच्या सेवेसाठी बांधील आहे.

१२.अशा विचाराने प्रेरित असणाऱ्या देशांतील लोकांनी जयहिंद संस्थेचा भाग व्हावे म्हणून प्रयत्न करणे.

१३.तसेंच वेळो वेळी शहीद कुटुंबाच्या तसेच या क्षेत्रातील तज्ञ लोकांच्या ज्या काही सूचना, समस्या, सल्ले असतील त्या प्रमाणे संस्थेच्या कार्यात बदल करून ते सर्व सोडवणं.

१४. जे सैनिक अपंग अवस्थेत निवृत्त झालें असतील त्यांच्यासाठी काही करता येईल का ? या बाबत चर्चा करून निर्णय घेणे.

१५. सैनिकांच्या विधवा महिला असतील त्यांच्या पुनर्विवाहा बाबतीत जनजागृती करून या कार्याची सुरवात करणे.

१६. ज्या सैनिकांनी युद्धात तसेच अनेक ऑपरेशन मध्ये विशेष अशी कामगिरी केली असेल त्यांच्या कार्याचा विशेष गौरव आणि सन्मान करणे.

| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **सचिव** |
| --- | --- | --- |
| श्री.संदीप माने | श्री.अनिल अनपट | श्री.हनुमंत मांढरे |
| 9168988866 | 9594068630 | 9892782317 |

# काळाच्या पड्याआड

मान्यवर व्यक्तींना श्रधांजली

- **कादर खान** – (जन्म 22 ऑक्टोबर 1937- 31 डिसेंबर 2018)
  चित्रपटक्षेत्र
  हिंदी चित्रपट कॉमेडियन तसेच एक चित्रपट दिग्दर्शक होते . त्यांनी 300 हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यांचा पहिला चित्रपट डाग (1973) होता, ज्यात कादर खान यांनी एका खटल्यात वकिलाची भूमिका केली होती. त्यांनी इस्माईल युसूफ कॉलेजमधून पदवी संपादन केली. तसेच त्यांनी शिक्षक म्हणूनही काम केले. कादर खान यांचे 31 डिसेंबर 2018 रोजी सायंकाळी 6 वाजता कॅनडामध्ये निधन झाले. त्याला कॅनडाच्या मिसिसॉगा शहराच्या स्मशानभूमीत धार्मिक विधिवत दफन करण्यात आले.
- **जॉर्ज मॅथ्यू फर्नांडिस** ( ०३ जून १९३०- २९ जानेवारी २०१९ ):
  राजकीयक्षेत्र
  कामगारनेते, पत्रकार आणि संसदपटू असलेले जॉर्ज फर्नांडिस भारताच्या समाजवादी चळवळीतील महत्त्वाचे नेते आहेत. ते जनता दल (संयुक्त) पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत. केंद्रीय मंत्री या नात्याने उद्योग, रेल्वे आणि संरक्षण या खात्यांसह अनेक खात्यांचा कार्यभार त्यांनी सांभाळला आहे. त्यांचा मृत्यू २९ जानेवारी २०१९ रोजी ८८ व्या वर्षी झाला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 1970 मध्ये जाहीर केलेल्या आणीबाणीविरूद्ध लढा देण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आणीबाणीच्या वेळी बडोदा डायनामाइट प्रकरणात त्याला अटक करण्यात आली होती.

- **मनोहर गोपाळकृष्ण प्रभु पर्रीकर**(१३डिसेंबर१९५५ - १७ मार्च २०१९) राजकीयक्षेत्र
  हे भारतीय जनता पक्षाचे राजकारणी होते. पर्रीकर २००० ते  २००५ व २०१२ ते  २०१४, तसेच १४ मार्च २०१७ ते १७ मार्च २०१९ या कालावधीत गोवा राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर होते. आजार असूनही त्यांनी ऑफिसमध्ये सेवा बजावली. आजारपणाच्या काळातच त्यांनी गोवा अर्थसंकल्प 2019-20 सादर केला. ९ नोव्हेंबर २०१४ रोजी केंद्रीय कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली होती.
- **गिरीश कर्नाड** (जन्म : १९ मे १९३८; मृत्यू : १० जून २०१९) चित्रपटक्षेत्र
  हे कन्नड भाषेतील आधुनिक भारतीय नाटककार, दिग्दर्शक आणि कलाकार होते. त्यांचा जन्म १९ मे १९३८ रोजी माथेरान येथील एका कोकणी कुटुंबात झाला. गिरीश कर्नाड हे १९७६-७८ मध्ये कर्नाटक साहित्य अकादमीचे अध्यक्ष होते आणि १९८८-९३ मध्ये नाटक अकादमीचे सभापती होते. त्यांना त्यांच्या नाट्यक्षेत्रातील योगदानासाठी कर्नाटक विद्यापीठाने डॉक्टरेटने आणि युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियाने डी.लिट. या पदवीने सन्मानित केले आहे.
- **शीला दीक्षित** (जन्म- ३१ मार्च  १९३८ मृत्यू - २० जुलै २०१९) राजकीयक्षेत्र
  दिल्ली राज्याच्या माजी मुख्यमंत्री होत्या. त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या सदस्य होत्या.  १९९८ सालापासून तीन वेळा त्या दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावर निवडून आल्या व त्यांनी एकूण १५ वर्षे

मुख्यमंत्रीपद सांभाळले. परंतु २०१३ दिल्ली विधानसभा निवडणूकीमध्ये आम आदमी पार्टीच्या अरविंद केजरीवालनी दीक्षित ह्यांना नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघामध्ये पराभूत केले.ह्याआधी १९८४ सालातील लोकसभा निवडणुकांमध्ये उत्तर प्रदेश राज्यातील कनोज लोकसभा मतदारसंघातून त्या लोकसभेवर निवडून गेल्या. शीला दीक्षित यांचे वयाच्या 81 व्या वर्षी निधन झाले.

- **सुषमा स्वराज** (जन्म - १४ फेब्रुवारी १९५२ मृत्यू - ६ ऑगस्ट २०१९)
  राजकीयक्षेत्र
  माजी परराष्ट्र व्यवहार मंत्री सुषमा स्वराज यांचे 6 ऑगस्ट 2019 रोजी निधन झाले. त्यांचे 67 वर्षांचे होते. हृदयविकाराच्या झटक्याने सुषमा स्वराज यांचे निधन झाले.परराष्ट्र व्यवहार मंत्री असताना त्यांनी अनेक भारतीयांना वाचवले आणि त्यांना मदत केली. सुषमा स्वराज बऱ्याच दिवसांपासून किडनी डिसऑर्डरने ग्रस्त होती, 2016 मध्ये त्यांना मूत्रपिंड प्रत्यारोपण करण्यात आले होते. सुषमा स्वराज यांनी अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये माहिती आणि प्रसारणमंत्री, दूरसंचारमंत्री, आरोग्यमंत्री आणि संसदीय कार्यमंत्री ही मंत्रिपदे सांभाळली. त्या डिसेंबर २००९ ते मे २०१४ दरम्यान लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या होत्या.

- **अरुण जेटली** (जन्म- २८ डिसेंबर १९५२ मृत्यू-२४ ऑगस्ट २०१९)
  राजकीयक्षेत्र
  हे भारतीय जनता पक्षाचे एक ज्येष्ठ नेते होते. जेटली अटलबिहारी वाजपेयी मंत्रिमंडळात कायदेमंत्री आणि जलवाहतूकमंत्री होते. २००० पासून

ते राज्यसभेचे सदस्य होते. २००९ मध्ये त्यांची राज्यसभेतील विरोधीपक्षनेते म्हणून नियुक्ती झाली. २०१४ ते २०१९ या काळात अरुण जेटली हे केंद्रीय मंत्रिमंडळात अर्थमंत्री होते. पंतप्रधान मोदींचे जवळचे सहकारी अशी त्यांची ओळख होती.

- **राम जेठमलानी** (14 सप्टेंबर 1923 - 8 सप्टेंबर 2019)
  राजकीयक्षेत्र
  एक भारतीय वकील आणि राजकारणी होटे . त्यांनी भारताचे केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री, भारतीय बार कौन्सिलचे अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून काम केले. 1988 मध्ये ते राज्यसभेचे सदस्य आणि 1996 मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय कायदे, न्याय आणि कंपनी व्यवहार मंत्री होते.
- **विजू खोटे** (जन्म - १७ डिसेंबर १९४१ मृत्यू - ३० सप्टेंबर २०१९)
  चित्रपटक्षेत्र
  हे हिंदी चित्रपटांतून काम करणारे मराठी अभिनेते होते. त्यांनी ४४०पेक्षा अधिक मराठी आणि हिंदी चित्रपटांतून कामे केली होती.
  "सरदार मैने आपका नमक खाया है ('शोले' चित्रपटातला काल्या डाकू.).
  " गलतीसे मिस्टेक हो गया" (चित्रपट 'अंदाज अपना अपना' ) हे त्यांचे गाजलेले डायलॉग आहेत
- **डॉ. श्रीराम बाळकृष्ण लागू** (जन्म - १६ नोव्हेंबर १९२७) रोजी सातारा येथे झाला होता ,तर मृत्यू - १७ डिसेंबर २०१९ रोजी पुणे येथे झाला. मराठी व हिंदी नाट्यसृष्टी-चित्रपटसृष्टीतील अभिनेते व दिग्दर्शक होते.

**……..टीम फॉक्स पब्लिकेशन**

फॉक्स पब्लिकेशनचा वार्षिक अंक कसा होता.
rightwriter23@gmail.com वर नक्की प्रतिक्रया द्या. आपल्या प्रतिक्रिया आम्हास मार्गदर्शक ठरतात.

**ई-मासिकात डिजिटल जाहिरात घेण्यास सुरुवात झाली आहे.जाहिरातीसाठी फॉक्स पब्लिकेशन्स फेसबुक पेज ला भेट दया. इतर मासिकात व्यापार,व्यवसायाची प्रभावी डिजिटल जाहिरात करण्यासाठी ई-मेल किंवा ८६००३३९३९४ वर संपर्क करा .**

Fox Publication **फेसबुक पेज ला भेट दया.**

**आमची इतर काही ई-बुक खाली नावावर क्लिक करा आणि त्वरित मिळवा.**

मै नरेंद्र दामोदरदास मोदी   भारताच्या पंतप्रधान मोदींचा जीवनपरिचय मराठीतून.

सत्ता केंद्र : शरद पवार   महाराष्ट्राच्या लाडक्या नेत्याचा राजकीय प्रवास .

आर्थिक मंदी उपाययोजना   आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी नक्की वाचा .

बचत आणि श्रीमतीचे रहस्य  वाचा आणि श्रीमत व्हा

instagram मधून लाखो रुपये कमावण्याची संधी  सोशल माध्यमातून पैसे कमवा

माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य  १९६० पासूनचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्र्याची सविस्तर माहिती